# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३०२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ३० डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## नववर्ष साजरे करणे हराम; फतवा काढत मुस्लीम समाजाला सेलीब्रेशन न करण्याचा इशारा


### मुस्लीम समाजातील तरुण तरुणींनी नवीन वर्ष साजरे न करण्याचा काढला फतवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०बरेली उत्तरप्रदेश**

२०२४ वर्ष संपत आले असताना लोकांनी २०२५ च्या स्वागताची तयारी सुरू केली आहे. अशातच आता नववर्षासंदर्भात मुस्लिमांसाठी उत्तर प्रदेशातील बरेली येथून एक फतवा जारी करण्यात आला आहे. या फतव्यामध्ये नवीन वर्ष साजरे करणे हराम आणि गुन्हा आहे आणि जो साजरा करेल तो शरियतच्या दृष्टीने गुन्हेगार असेल असं म्हटलं आहे. मुस्लिमांना असे न करण्याच्या सूचना फतव्यातून दिल्या आहेत.

ऑल इंडिया मुस्लिम जमातचे राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना शहाबुद्दीन रझवी बरेलवी यांनी नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनला उपस्थित राहून शुभेच्छा देण्याविरुद्ध फतवा काढला होता. राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना शहाबुद्दीन रझवी बरेलवी म्हणतात की हे नवीन वर्ष म्हणजे इंग्रजी वर्षाची सुरुवात असते. त्यामुळे मौलानांनी फतवा काढून नववर्षाचे स्वागत न करण्याचा इशारा दिला आहे.

चश्मे दारफ्ता बरेलीने हा फतवा जारी केल्याचे रझवी



यांनी सांगितले. यामध्ये मुस्लिम समाजाला नववर्षाच्या उत्सवात सहभागी न होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रझवी म्हणाले की, नववर्ष साजरे करणाऱ्या तरुण-तरुणींसाठी हा फतवा सांगतो की,नववर्ष साजरे करणे ही अभिमानाची गोष्ट नाही. त्यामुळे ते साजरे करु नये किंवा ते शुभेच्छाही देऊ नये. मुस्लिमांसाठी अशा गैर-धार्मिक कृती निषिद्ध आहेत. नवीन मुला-मुलींना नवीन वर्ष साजरे न करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुस्लिमांनी नववर्ष साजरे करणे टाळावे. मुस्लिमांनी धार्मिक कार्यात सहभागी व्हावे.

अनेक मुस्लिम मुले-मुली नवीन वर्ष साजरे करतात आणि एकमेकांना शुभेच्छा देतात.हा ख्रिश्चनांचा धार्मिक विधी आहे. इस्लाममध्ये, इतर कोणत्याही धर्माच्या धार्मिक विधींमध्ये सहभागी होण्यास किंवा त्यांचे पालन करण्यास मनाई आहे. फतव्यात असेही म्हटले आहे की, नवीन वर्षाच्या उत्सवादरम्यान नाच, गाणे, आवाज करणे, दारू पिणे आणि जुगार खेळणे या सगळ्या गोष्टी केल्या जातात ज्यांना इस्लाममध्ये सक्त मनाई आहे. त्यामुळे अशा कार्यक्रमांमध्ये सहभागी होणारा कोणताही मुस्लिम गुन्हेगार समजला जाईल, असे मौलाना रझवी म्हणाले.

## राष्ट्रीय बाल पुरस्कार प्राप्त करिनाचे आता बॉक्सिंग स्पर्धेतही 'सुवर्णांकित'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

आग लागलेल्या सदनिकेत स्वत:ला झोकून देत सिलिंडर बाहेर काढून ७० कुटुंबांचे रक्षण करणाऱ्या येथील करिना थापा हिला नुकतेच राष्ट्रपतींच्या हस्ते प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान करण्यात आला. आता करिनाने रविवारी मुंबईत पार पडलेल्या प्रो प्रिमिअर लिग या राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेतही सुवर्णपदक प्राप्त करून महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

प्रो प्रिमिअर लिगच्या वतीने मुंबईतील मिहिर सेन क्रीडा संकुलात राष्ट्रीय



बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी पार पडलेल्या सामन्यांत १७ वर्षीय करिना हिने १९ वर्षे वयोगटाच्या आतील ५० ते ५५ किलोग्रॅम वजन गटात उत्तर प्रदेशच्या प्रतिस्पर्ध्याला पराभूत करून सुवर्णपदक पटकावले. त्याआधी उपांत्य सामन्यात तिने राजस्थानच्या स्पर्धकाचा पराभव केला होता. मार्शल आर्ट क्रीडा प्रकारातील स्पर्धा या क्रीडा संकुलात घेण्यात आल्या होत्या. करिनाने किकबॉक्सिंग या प्रकारात कौशल्य दाखविले. या स्पर्धेत विविध राज्यांमधील ८०० स्पर्धक सहभागी झाले होते

करिना ही अमरावती बॉक्सिंग क्लबची सदस्य असून गौरव वानखडे हे तिचे प्रशिक्षक आहेत. या यशाबद्दल अमरावती बॉक्सिंग क्लबच्या सचिव सविता बावनथडे आणि करिना हिचे मार्गदर्शक नरेंद्र तायडे यांनी करिनाचे अभिनंदन केले आहे.

## वाल्मिक कराडचा फोन बंद होण्याआधीचे लोकेशन उज्जैन



### फोटोत पोलिस अंगरक्षकही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०उज्जेन मध्यप्रदेश**

बीड जिल्ह्यातील मस्साजोर या गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील आरोपींच्या शोधासाठी सीआयडीने मोठी कारवाई केली आहे. सीआयडीने सर्व आरोपींची संपत्ती जप्त करण्यास सुरुवात केली आहे. या हत्येच्या प्रकरणात वाल्मिक कराड हे मास्टरमाइंड असल्याचा आरोप होत आहे. यामुळे आता तपास यंत्रणेने वाल्मिक कराड याचा शोध सुरू केला आहे. पण, कराड याचा अजूनही पत्ता लागलेला नाही. वाल्मिक कराडच्या शेवटच्या लोकेशनबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. कराड याचे शेवटचे लोकेशन मध्य प्रदेशातील उज्जैनमध्ये होते, यानंतर त्याचा फोन बंद असल्याचे समोर आले आहे.

वाल्मिक कराड याचा १३ डिसेंबर पर्यंत फोन सुरुच होता. पण यानंतर कराड याचा फोन बंद झाला. ११ डिसेंबर रोजी वाल्मिक कराड आपल्या सहकाऱ्यांसह मध्य प्रदेशमधील श्री क्षेत्र उज्जैन महाकाल ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले. हे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या दिसत आहेत.

बीड जिल्ह्यातील मस्साजोर येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील मास्टरमाइंड वाल्मिक कराड असल्याचा आरोप होत आहे. कराड याच्या सांगण्यावरुन हत्या केल्याचा आरोप होत आहे. सरपंच देशमुख यांच्या हत्येला २१ दिवस उलटून गेले पण अजूनही काही आरोपींना पोलिसांनी अटक केलेली नाही. दरम्यान, आता या आरोपींना पकडण्यासाठी सर्व पक्षांकडून दबाव वाढला आहे. काही दिवसापूर्वी बीडमध्ये आक्रोश मोर्चा निघाला. या मोर्चात सर्व पक्षीय नेत्यांची उपस्थिती होती.

सीआयडीने आरोपींची संपत्ती जप्त करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच वाल्मिक कराड याच्या निकटवर्तीयांची चौकशी केली जात आहे. पोलिसांनी वाल्मिक कराड याची चारही बाजूंनी कोंडी केली आहे. यामुळे आता कराड पोलिसांसमोर शरणागती पत्करणार असल्याचे बोलले जात आहे.

## सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री फडणवीस आणि धनंजय मुंडेंमध्ये चर्चा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर राज्यातील सामाजिक आणि राजकीय वातावरण ढवळून निघालं आहे. या हत्या प्रकरणातील तीन आरोपी अजूनही फरार असून या प्रकरणाशी संबंधित खंडणीच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड हादेखील अद्याप पोलिसांच्या हाती लागला नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. वाल्मिक कराड आणि हत्या प्रकरणातील इतर आरोपी हे राष्ट्रवादीचे नेते आणि कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असल्यानेच अटकेला विलंब होत असल्याचा आरोप होत आहे. अशातच आज सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध पाच खात्यांच्या सचिवांची बैठक बोलावलेली असतानाच मंत्री धनंजय मुंडेही तिथे दाखल झाल्याने चर्चांना उधाण आलं आहे.



देवेंद्र फडणवीस यांनी पाच खात्यांच्या आगामी १०० दिवसांच्या रोड मॅपचा आढावा घेण्यासाठी सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीला संबंधित खात्यांचे मंत्री उपस्थित राहणार नव्हते. मात्र अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे हेदेखील मुख्यमंत्र्यांच्या एंट्रीनंतर काही वेळातच सह्याद्री अतिथीगृहावर दाखल झाल्याने या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

बीड हत्या प्रकरणावरून राजकारण तापलं असून निष्पक्ष तपास होण्यासाठी धनंजय मुंडे यांना मंत्रिपदावरून दूर करा, अशी मागणी सर्वपक्षीय नेतेमंडळींकडून केली जात आहे. तसंच हत्या आणि खंडणी प्रकरणातील आरोपी अजूनही फरार असल्याने गृहखात्याच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झालं असून सरकारवरील दबाव वाढत चालला आहे. त्यामुळे आज सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री फडणवीस आणि धनंजय मुंडे हे दोन्ही पोहोचले असल्याने सदर नेत्यांमध्ये बीड प्रकरणाबाबत चर्चा झालेली असू शकते. मात्र याबाबतची अधिकृत माहिती अद्याप देण्यात आली नाही.

**तपासाचा वेग वाढला**

हत्या प्रकरणातील सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे आणि खंडणीतील वाल्मीक कराड या चार आरोपींचे बँक खाते गोठविण्यात आले आहे. तसेच त्यांच्या शोधासाठी सीआयडीच्या नऊ पथकांकडून देशभरात धावाधाव सुरू आहे. यामध्ये जवळपास १५० अधिकारी, कर्मचारी असल्याचे सूत्रांनी सांगितले. या सर्व फरार आरोपींचे पासपोर्टबाबतही कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे त्यांना देश सोडून जाता येणार नाही. सीआयडीचे छत्रपती संभाजीनगरचे पोलिस अधीक्षक सचिन पाटील हे रात्री आठ वाजताही बीड शहर ठाण्यात ठाण मांडून होते.

## अण्णांवर चिखलफेक कशी करु शकता; वाल्मिक कराड विरोधातील गुन्हे मागे घेण्यासाठी महिलांचे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०बीड**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचे नाव आल्याने राज्यातलं राजकीय वातावरण चांगलेच तापलं आहे. त्यामुळे वाल्मिक कराडच्या अटकेची मागणी अनेक आमदारांनी व इतर लोकप्रतिनिधिंनी लावून धरली आहे. मात्र अद्यापही वाल्मिक कराड हा फरार असून सीआडीकडून त्याचा शोध सुरु आहे. दुसरीकडे, वाल्मिक कराडवर झालेले खोटे गुन्हे मागे घेण्यासाठी बीडमध्ये उपोषण करण्यात येत आहे.



सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड असल्याचा दावा केला जात असून त्याच्या अटकेसाठी सीआयडीकडून शोध सुरु आहे. बीड येथे पवनऊर्जा कंपनीच्या खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र आता वाल्मिक कराडच्या समर्थनात उपोषण करण्यात येत आहे. बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मयुरी विजयसिंह बांगर या उपोषण करत आहेत.

वाल्मिक कराडवर पोलिसांनी खोटे गुन्हे दाखल केले असल्याचा दावा मयुरी विजयसिंह बांगर यांनी केला आहे. राजकीय द्वेषातून हे आरोप करण्यात आले आहेत. त्यांच्यावर जी चिखलफेक करण्यात येत आहे ती थांबवली पाहिजे. वाल्मिक कराड यांच्यावर असलेले खोटे गुन्हे मागे घेण्यात यावेत. आरोप खरे असतील तर त्यावर कारवाई केली जाईल. तुमच्याकडे काही पुरावा आहे का? तुम्ही पुराव्याशिवाय अण्णांवर चिखलफेक कशी करु शकता. त्यांचा हा खरा चेहरा नाही. त्यांनी खूप समाजकार्य केले असून अनेक भगिनींचे कल्याण केले आहे. माझ्या सारखे अनेकजण त्यांच्यासाठी आवाज उठवू पाहत आहेत, असं उपोषणकर्त्या मयुरी विजयसिंह बांगर यांनी म्हटलं आहे.

## धनंजय मुंडेंना टार्गेट केल्यास, रस्त्यावर उतरू'; बबनराव तायवाडे यांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरुन राजकारण तापले आहे. या हत्येचा मास्टरमाइंड मंत्री धनंजय मुंडे यांचा जवळचा कार्यकर्ता वाल्मिक कराड असल्याचा आरोप करण्यात येत आहे. काही दिवसापूर्वी बीडमध्ये आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. यावेळी अनेक नेत्यांनी धनंजय मुंडे यांचे मंत्रिपद काढून घेण्याची मागणी केली. दरम्यान, आता यावरुन ओबीसी नेते बबनराव तायवाडे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.



'एबीपी माझा' या वृत्तवाहिनीला दिलेल्या विशेष मुलाखतीमध्ये बबनराव तायवाडे यांनी आंदोलनाचा इशारा दिला. तायवाडे म्हणाले, सरकारच्या तपास यंत्रणा काम करत आहेत. पण, कुठेही मुंडे यांचं नाव समोर आलेलं नाही. ओबीसी नेते मोठा होतोय म्हणून त्यांना जर टार्गेट केलं जात असेल आणि त्यांच्यावर जर अशी वेळ आली तर आम्ही त्यांच्या पाठीशी उभे राहू. त्यांच्यासाठी जे करता येईल ते आम्ही करु, असंही तायवाडे म्हणाले. ते दोषी असतील तर आम्ही दोषी माणसाच्या पाठीशी ओबीसी समाज उभा राहणार नाही, असंही तायवाडे म्हणाले.

## प्राजक्ता माळींच्या सन्मानाला कुठेही बाधा येऊ देणार नाही; मुख्यमंत्री फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या सन्मानाला बाधा येईल, असे कुठलेही कृत्य खपवून घेणार नाही आणि त्यावर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.भाजप आमदार सुरेश धस यांनी केलेल्या वक्तव्याप्रकरणी प्राजक्ता यांनी रविवारी सायंकाळी मुख्यमंत्री फडणवीस यांची सागर या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी



त्यांना कारवाईबाबत आश्वस्त केले.

यूटच्यूबवर काही लोकआपल्याविरोधात आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करतात, अशीही तक्रार प्राजक्ता यांनी यावेळी केली. त्या सर्वांवर सुद्धा कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना दिले. माळी यांनी १५ ते २० मिनिटे मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करून निवेदनही त्यांना दिले.

कराड याने बीडमध्ये इव्हेंटबाजी चालविली असून त्यात रश्मिका मंधाना, सपना चौधरी, प्राजक्ता माळी आदींचे इव्हेंट घडविले असे विधान आमदार धस यांनी केले होते.

## संपादकीय ......

# चला, गावखेड्यांना आत्मनिर्भर बनवू या!

'खेड्याकडे चला' ही ग्रामीण लोकजीवनाशी निगडित असलेली एक अभिनव चळवळ मानली जाते. राष्ट्रपिता महात्मा गांधी या संकल्पनेतून ही चळवळ इ. स. १९१६ मध्ये सुरू झाली. खऱ्या भारताचे दर्शन खेड्यात होत असल्याने महात्मा गांधीजींनी 'खेड्याकडे चला' अशी हाक दिली. त्यात प्रामुख्याने गावखेड्याचे सक्षमीकरण हा महत्त्वपूर्ण हेतू होता; परंतु आजचे वास्तव पाहिले तर खेडी, गावे ओस पडत चालली आहेत. त्याचे कारण उद्योगधंदा आणि रोजगारांसाठी जवळच्या शहरात प्रत्येक घरातील कर्ता व्यक्ती वास्तव्य करता करता तो कधी शहरी बाबू झाला याची त्यालाही कल्पना नसते. तालुका, जिल्हा, तसेच मुंबई, पुणे नागपूर, औरंगाबाद सारख्या राज्यातील शहरांचे भौगोलिक आकारमान हे दिवसेंदिवस वाढत चालले आहे, त्यामागे खेड्यांतून स्थलांतरित होणाऱ्यांची संख्या ही दिवसेंदिवस लक्षणीय आहे. त्यामुळे वाढता रोजगाराचा प्रश्न, वाढती गर्दी यामुळे गांधीजींचा हा मूलमंत्र आर्थिक समस्येचे निराकरण करण्याचा सोपा मार्ग सुचवतो. प्रत्येक गावखेडी स्वयंपूर्ण व्हावीत, ग्रामीण विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हावे, असे महात्मा गांधींनी स्वातंत्र्यपूर्व काळात सांगितले. देशाच्या स्वातंत्र्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या मूलमंत्राचा दखल घेऊन गावखेड्याच्या विकासासाठी योजना आखली गेली; परंतु त्याकडे म्हणावेसे तसे गांभीर्याने पाहिले गेले नव्हते, असे दुर्दैवाने म्हणावे लागेल.

केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी प्रत्येक गावात एक बहुउद्देशीय संस्था स्थापन करण्याची घोषणा केली आहे. यातून गाव खेड्यातच ३२ प्रकारच्या व्यवसायांची संधी उपलब्ध होणार आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून देशातील प्रत्येक गावात बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था, दुग्ध आणि मत्स्यपालन सहकारी संस्था सुरू करण्याच्या मोहिमेचा प्रारंभ शहा यांच्या हस्ते बुधवारी झाला आहे. येत्या पाच वर्षांत दोन लाख बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था सुरू करण्याचा केंद्र सरकारचा निर्धार आहे. अवघ्या तीन महिन्यांत ११ हजार ६९५ संस्थांची नोंदणी झाली आहे. पहिल्या टप्प्यात नाबार्ड २२ हजार, एनडीडीबी ५६ हजार ५०० अशा संस्था स्थापन करणार असून, दुसऱ्या टप्प्यात अनुक्रमे ४७ आणि ४६ हजार ५०० बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था, दुग्ध आणि मत्स्यपालन सहकारी संस्था स्थापन करण्यात येणार आहेत. याशिवाय राज्यांच्या मदतीनेही हजारो बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था स्थापन केल्या जाणार आहेत. त्यामुळे दोन लाख सहकारी संस्था सुरू करण्यासाठी पाच वर्षांचा काळ लागणार नाही, असा दावाही शहा यांनी केला.

गेल्या पंचाहत्तर वर्षांच्या काळात गावखेडीच्या संदर्भाने पुढे शासकीय स्तरावर विविध योजना राबविण्यात आल्या होत्या; परंतु या संकल्पनेत, मोहिमेपासून दुर्गम भागात निसर्ग सान्निध्यात वसलेल्या तांडा, वाडीवस्ती मात्र पूर्णपणे वंचित राहिली आहे. परिणामी तांडा, वाडीवस्त्याच्या तुलनेत गावखेडे पुढारली. पुढे २०१६ मध्ये प्रवाहापासून वंचित असलेल्या तांड्याच्या सक्षमीकरणासाठी 'तांडेसामू चालो' हे तांडावादी विचार सर्जनशील विचारवंत एकनाथराव नायक यांनी प्रथमच रुजवला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे. सर्वांमध्ये सलोखा निर्माण व्हावा. खेड्यांची रचना व्यवस्थाबद्ध व्हावी असे ग्रामवादी विचार 'खेड्याकडे चला' या संकल्पनेतून मांडले गेले होते. केंद्र सरकारच्या नव्या धोरणानुसार, प्रत्येक गावात एक बहुउद्देशीय संस्था सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे सध्या कागदावर असलेल्या प्राथमिक सहकारी संस्था बंद करण्याचा आणि तेथे नव्याने बहुउद्देशीय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात अशा १५ हजार संस्था बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.सहकारी संस्थेच्या सभासदांना मायक्रो एटीएम आणि किसान क्रेडिट कार्ड दिले जाणार आहे. बहुउद्देशीय सहकारी संस्थांना विविध गावांत सुविधा केंद्र, गॅसपुरवठा, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, वीज वितरण असे विविध ३२ स्वरूपाचे व्यवसाय करण्याची मुभा देण्यात आली आहे. पूर्वीच्या काळी बलुतेदार पद्धत, बार्टर सिस्टम गावात होती. त्यामुळे पैसे, रोख व्यवहारांचा फारसा संबंध येत नव्हता. आता कोणतेही गोष्ट पैशांशिवाय पूर्ण होत नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंत व्यक्तीशी निगडित आर्थिक व्यवहार हा जगण्याचा भाग बनला आहे. त्यामुळे भारताला सुजलाम सुफलाम बनविण्यासाठी पुन्हा एकदा गावे आर्थिकदृष्ट्या खेडी स्वयंपूर्ण करणे ही काळाची गरज आहे.गावातील पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक केल्यास स्थलांतर थांबेल. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या संयुक्त निधीतून ग्रामीण जीवनाचे संपूर्ण चक्र गतिमान करण्यासाठी खासगी क्षेत्राचीही मदत घेतली तर वावगे ठरणार नाही. केंद्र सरकारच्या सहकार विभागाकडून गावांना केंद्रस्थानी मानून विकासाचे आणि आर्थिक उन्नतीचे नवे मॉडेल तयार केले आहे, त्याचे स्वागतच करायला हवे.


# थकीत करवसुलीसाठी मनपा नव्या वर्षात करणार दबंग कारवाई

## जप्ती व लिलावाकरीता थकबाकी धारकांना बजावल्या नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

शहरातील मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कराची वसूली मोठ्या प्रमाणात थकीत आहे. या थकीत कराच्या वसुलीसाठी महापालिका प्रशासन आणि विभागाने वेळोवेळी विविध उपाययोजना आखून जोरदार प्रयत्न केले. यानंतरही वर्षानुवर्ष थकीत कराची थकबाकी ठेवणाऱ्या मालमत्ता धारकांवर नव्या वर्षापासून थेट कारवाईचा धडाका सुरु करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे.

महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी दिलेल्या माहितीनुसार महापालिका कराची थकीत वसुली केली जाणार आहे. मालमत्ता कर विभागातील ८० वसुली लिपिकांचेव अन्य कर्मचाऱ्यांची विशेष पथके तयार करण्यात आलेली आहे. इतके नव्हे तर नुकतीच प्रशासनाच्या वतीने टॅक्स बाबूंची बैठक घेऊन टॅक्स बाबूंना ७० ते



८० टक्के कर वसूली अनिवार्य असल्याच्या सूचना दिल्या. ज्या टॅक्स लिपिकाची वसूली सर्वात कमी असेल अशा लिपीकांवर कारवाईकरण्याचा इशारासुध्दा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला. गेल्या दोन वर्षापासून महापालिकेच्या वतीने असेसमेंटची प्रक्रिया करण्यात आल्यामुळे करवसुलीचा आकडा कमी झाला असून थकबाकीचा आकडा वाढला आहे. सन २००५ पासून मनपा क्षेत्रातील मालमत्तांचे सर्वेक्षण व करमूल्यांकन करण्यात आले नव्हते. ते वर्ष २०२३ मध्ये पार पडले. सर्वेक्षणानंतर ४० कोटीचे वार्षिक उत्पन्न १५० कोटी वर पोहोचले. विशेष म्हणजे गत वर्षीच्या अंदाजपत्रकातसुध्दा याच आकड्यांचा वापर करुन आर्थिक उत्पन्न वाढीनुसार विकास कामे सुचविण्यात आली. मात्र प्रत्यक्षातउत्पन्न काही नसल्याने दोन वर्षापासून महापालिका ठणठण गोपाल झाली आहे. नव्या कर आकारणीनुसार वार्षिक उत्पन्न जरी १५० कोटीपेक्षा अधिक असले तरी लोकसभा निवडणुकीपूर्वीच जून्या दराने वसुली करण्याचे आदेश मिळाल्याने प्रशासनाने पुन्हा जुन्या दरानेच कर वसुली करण्यासंदर्भात जनजागृती करुन कर भरण्याचे आवाहन केले. प्रत्यक्षात मात्र महापालिकेच्या या आवाहनाला नागरिकांचा जसा पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नसल्याने आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे नव्या वर्षात ही आर्थिक अडचण दूर करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने लाखोंच्या घरात थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांना नोटिस पाठविणे सुरु केले आहे. नव्या वर्षात जप्ती व लिलावाची कारवाई करुन थकबाकी वसुली करण्याचे नियोजन आखण्यात आले आहे.

### नागरिकांनी सहयोग करावा



महापालिकेचे अनेक प्रोजेक्ट तसेच नियमित देयकेसुध्दा आर्थिक नियोजन बिघडल्यामुळे थकीत आहेत. आता मालमत्ता कराची वसुली जुन्याच पध्दतीने होत असूनही नागरिकांकडून प्रतिसाद अत्यल्प असल्याने लाखोंची थकबाकी असणाऱ्या मालमत्ताधारकांची यादी तयार करण्यात आली असून केवळ आर्थिक नियोजन व्हावे याकरिता सक्तीची वसूली करण्यात येणार आहे. निश्चितच प्रशासनाला जनतेकडून सहकार्याची अपेक्षा आहे.

**डॉ. सचिन कलंत्रे, मनपा आयुक्त–**

# एकात्मिक शेती पद्धतीद्वारे उत्पादनात होईल वाढ; आर्थिकतेची भरभराट




**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक** – दिवसेंदिवस लागवडी खालील जमिनीचे क्षेत्र घटत चालले आहे ज्यातून प्रति मनुष्य शेती धारणा कमी होत चालली आहे. यासोबतच उत्पादित होणाऱ्या शेतमालाला अपेक्षित दर नसल्याचे वारंवार शेती व्यवसाय धोक्याचा अशी समज निर्माण होत आहे.

तसेच बदलत्या हवामानामुळे आणि शेतीत वाढलेल्या विविध संकटांमुळे अलीकडे पारंपारिक शेती ही तोट्याची शेती म्हणून नावारूपाला येत आहे. मात्र शेतीत पारंपारिक शेती पद्धती यांच्याशी शेती निगडित विविध व्यवसाय व आधुनिक पीक पद्धती यांची योग्य सांगड घालून अधिक उत्पादन वाढवण्यासाठी राज्यातील विविध कृषी विद्यापीठांनी आपापल्या परिसरनिहाय एकात्मिक शेती पद्धती विकसित केल्या आहेत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

ज्यात प्रसारित केलेल्या विविध पद्धतींचा उपयोग करून शेतकरी आपल्या पारंपारिक शेतीला समृद्ध करत त्यातून अधिकाधिक नफा मिळवू शकतो. यासाठी आपण आपल्या परिसरातील कृषी विद्यापीठांना भेट देणे गरजेचे असून त्यांच्यामार्फत त्या–त्या परिसराकरिता कोणती एकात्मिक शेती पद्धत योग्य आहे याची माहिती घेऊन त्याचा आपल्या शेतामध्ये अवलंब करणे गरजेचे आहे.

एकात्मिक शेती पद्धतीचे फायदे

अधिक, शाश्वत, आर्थिक उत्पादकताप्रदुषण रहित वातावरण

नविन तंत्रज्ञानांचा वापर, उर्जेच्या समस्यांचे निराकरण

वनांचे संरक्षण करणे व फायदेशीर उत्पन्न घेणे

संतुलित अन्न सोबत वर्षभरात सतत पैसा मिळणे

मनुष्य बळ निर्माण होणे किंवा व्यवसाय मिळणे

एकात्मिक शेती पद्धतीद्वारे पिकपद्धती व विविध शेतीशी निगडीत उद्योग यांची खालील प्रमाणे सांगड घालावी

पीक पद्धती + गाई/म्हशी + गांडुळखत उत्पादन बांधावरील फळझाडे + भाजीपाला

पीक पद्धती + गाई/म्हशी/किंवा कुक्कुट पालन फळझाडे

पीक पद्धती + रेशीमशेती/शेत तळ्यातील मत्स पालन

पीक पद्धती + शेळी/मैली/वराह पालन + भाजीपाला

पीक पद्धती + फुलशेती औषधी वनस्पती शेळी पालन किंवा गाई व म्हशी पालन




# १४ दिवस साखर खाणं सोडल्यास काय फरक पडेल, तुमच्या शरीरात किती होतील बदल?

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक**

साखर ही आरोग्यासाठी हानिकारक मानली जाते. एका मर्यादित साखरे खाणं ठीक आहे, परंतु जास्त प्रमाणात खाल्ल्याने मधुमेह, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब यांसारख्या अनेक समस्या उद्भवू शकतात.

साखरेशिवाय आपण रोज जे काही खातो, त्यातही साखर आढळते, उदाहरणार्थ, कोल्ड्रिंक्स, कुकीज, बिस्किट आणि ब्रेडमध्येही साखर आढळते. थकज च्या मते, दिवसाला ५० ग्रॅमपेक्षा जास्त साखर धोकादायक असू शकते. अशा परिस्थितीत केवळ दोन आठवडे म्हणजेच १४ दिवस साखर खाल्ली नाही तर शरीराला किती फायदा होईल हे जाणून घेऊया...

जास्त साखर खाण्याचे दुष्परिणाम

- स्नायू आणि सांधे दुखणे
- अकाली वृद्धत्वाची चिन्हे
- जास्त खाण्याची इच्छा
- दातांमध्ये समस्या
- पोटात सूज येऊ शकते
- दिवसभरातील एनर्जी लेव्हलमध्ये बदल
- वजन वाढणे
- पुन्हा पुन्हा आजारी पडणे
- मूड स्विंग्स

पहिले ७ दिवस साखर सोडल्यानंतर शरीरातील बदल

आरोग्य तज्ञांच्या मते, साखर सोडणं इतकं सोपं नाही. त्यामुळे सुरुवातीचे दोन–तीन दिवस खूप त्रास होऊ शकतो. त्यामुळे डोकेदुखी, पोटदुखी, थकवा यासारख्या समस्या उद्भवू शकतात. हे देखील एक लक्षण आहे की, तुमचे शरीर साखरेशिवाय राहू शकतं. असं तीन दिवस केलंत तर चौथ्या दिवसापासून तुमचे शरीर पूर्णपणे ताजेतवानं वाटू लागतं. तुम्हाला खूप ऊर्जा जाणवेल. शुगर




लेव्हल नियंत्रणात राहील.

**८ ते १४ दिवसांत काय होईल?**

सात दिवसांनंतरही साखर खाल्ली नाही तर पचनक्रिया सुधारण्यास सुरुवात होते. यामुळे बद्धकोष्ठता, सूज येणे आणि पोटाशी संबंधित समस्यांपासून आराम मिळेल. त्यामुळे भूक कमी होऊन झोप चांगली लागते. यानंतर साखर खाण्याची इच्छा कमी होऊ लागते. झोपेशी संबंधित समस्याही दूर होऊ शकतात.

**दररोज किती साखर खावी?**

अमेरिकन हार्ट असोसिएशनने सल्ला दिला आहे की, पुरुषांनी दिवसातून १५० कॅलरीज म्हणजे जवळपास ३६ ग्रॅमहून जास्त साखर खाऊ नये, तर महिलांसाठी हे प्रमाण १०० कॅलरीज म्हणजे २४ ग्रॅम आहे. यापेक्षा जास्त साखर हानिकारक असू शकते.

# महाराष्ट्र राज्य आरोग्य सहाय्यक निरीक्षक कर्मचारी संघटनेचे अधिवेशन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०शेगावं–** महाराष्ट्र राज्य आरोग्य सहाय्यक निरीक्षक संघटनेचे हिवाळी अधिवेशन शेगाव येथे भास्कर हॉलमध्ये मोठ्या थाटात पार पडले.सर्वप्रथम श्री संत गजानन महाराज प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच माजी पंतप्रधान मनमोहन सिंग, स्व.रतन टाटा, पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसेन यांना आदरांजली वाहून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे संस्थापक राज्याध्यक्ष धर्मा वानखडे,तर प्रमुख अतिथी म्हणून राजेश राठोड, रमेश पागरूत,लक्ष्मण मराठे,हे होते.देवानंद ताजने, राजेश राठोड, संजय सहारे यांची यथोचित भाषणे झाली. त्यानंतर संघटनेचे राज्यअध्यक्ष धर्मा वानखडे यांनी सखोल समस्या विषयी वेतनत्रुटी निवारण ,पदनाम बदल, इन्सेंटिव्ह, हार्डशीप भत्ता,कायम प्रवास भत्ता या बाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.पुढे



ते म्हणाले आपल्या न्याय हक्कासाठी आपल्याला सर्वतोपरी लढावं लागणार आहे. मग येणाऱ्या अनेक समस्यांना तोंड देण्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या पाठीशी महाराष्ट्र राज्य आरोग्य सहाय्यक निरीक्षक संघटना ही सदैव तत्पर राहील.

संघटनेची पुढील दिशा ठरवण्यात आली.संघटनेचे पदाधिकारी सदस्य अधिवेशनास उपस्तित होते. कार्यक्रमाचे संचालन, आभार प्रदर्शन तुलसीदास झुंजूरकर यांनी केले.

# भूषण पुरस्काराने मा.पुंडलिक एकनाथ गोसावी नागपूर येथे सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती :** मदत सामाजिक संस्था नागपूर द्वारा २२ वे राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्ता संमेलन व पुरस्कार सोहळा २२ डिसेंबर २०२४ रोजी श्री गुरुदेव सेवाश्रम आश्रम नागपूर येथे आयोजित केला होता,

या सोहळ्यात अमरावती निवासी पुंडलिक जनाबाई एकनाथ गोसावी राष्ट्रीय प्रशिक्षक, व्याख्याता, उद्योजकता विकास मार्गदर्शक, सामाजिक कार्यकर्ते यांना राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले,

सामाजिक कार्यकर्ता संमेलन पुरस्कार सोहळ्यामध्ये विचार पिठावर अध्यक्षस्थानी मा.गिरीश भाऊ पांडव नागपूर हे होते, उद्धघाटक मा.ड.अशोक यावले अध्यक्ष गुरुदेव सेवाश्रम मंडळ नागपूर,तर अतिथी मनोज साबळे, संजय कडोळे, अशोक गवळी, मा.ड.निल लाडे अध्यक्ष मदत सामाजिक संस्था, धर्मेंद्र धनविजय, सुरेश मेश्राम जेष्ठ कलावंत संजय गुळघाटे नागपूर, सुदाम खरे कवी बुलढाणा, पद्माकर कांबळे वर्धा, डॉ. मंदाकिनी जवादे, हंसिनी उचित, अर्चना गोसावी उपस्थित होते.याप्रसंगी पुंडलिक एकनाथ गोसावी यांनी सामाजिक, शैक्षणिक, उद्योजकता विकास, सामाजिक दायित्वातून, सामाजिक कार्य, समाज प्रबोधन, ग्रामीण शहरी महिला समूहांना आर्थिक सक्षम करण्याच्या उद्देशाने मार्गदर्शन प्रशिक्षण, स्वयंरोजगारा साठी कार्य करीत आहे, उद्योजकता विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून मार्गदर्शन प्रबोधन व वक्ता म्हणून सामाजिक कार्यामध्ये योगदान देऊन सामाजिक उपक्रमांमध्ये कार्य करीत आहे, महिला, युवक, युवती वर्गाला शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक संदर्भाने प्रबोधन मार्गदर्शन सातत्याने करत आहेत,पुंडलिक एकनाथ गोसावी यांच्या सामाजिक, शैक्षणिक, उद्योजकता विकास मार्गदर्शन, सांस्कृतिक कार्याची दखल घेऊन मदत सामाजिक संस्था नागपूर



यांच्या वतीने,मदत सामाजिक संस्था नागपूर द्वारा राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्ता संमेलनामध्ये मा. अध्यक्ष गिरीश पांडव साहेब, दिनेश बाबू वाघमारे सचिव मदत सामाजिक संस्था नागपूर,सुदाम खरे, सुरेश मेश्राम, पद्माकर कांबळे, संजय गुळघाटे, हंसिनी उचित, अनिल नगराळे यांच्या हस्ते दुपट्टा, आकर्षक सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, भारतीय संविधानाची प्रत, गुलाब पुष्प देऊन मा.पुंडलिक एकनाथ गोसावी यांना सह पत्नीक सन्मानित करण्यात आले,पुरस्काराबद्दल डॉ. गोवर्धन गावंडे, हिम्मतराव इंगळे, प्राचार्य दिनेश उघडे, ड. पवन प्रभे, प्रबंधक विनोद गोसावी, नीलिमा वाढीवे, डॉ. प्रशांत राऊत, अल्का लोखंडे, प्रबंधक भूषण साबळे,महिंद्रा वानखडे, दीपक कळसकर, पुष्पा वानखडे, आशिष मेश्राम, सचिन मेश्राम, विना मेश्राम, माधुरी मेश्राम, प्रभावती रणवरे, आसिफ शेख, संदीप तिरपुडे, वंदना शेंडे,यांच्या सह अनेक मान्यवरानीत्यांचे अभिनंदन केले.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा –prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ३० डिसेंबर २०२४ | शहर/ग्रामिण


# शहरात पोलिसांच्या बंदोबस्तात नववर्षाचे स्वागत

## उद्या ३१ डिसेंबरला ८८ अधिकाऱ्यांसह ८०० पेक्षा अधिक पोलिस ऑन रोड

### गुन्हेशाखा, वाहतूक विभागाची स्वतंत्र पथकेप्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत फिक्स पाईन्ट



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती** डिसेंबर रोजी साजरा होणारा नववर्षाचा जल्लोष अवध्या काही तासावर आल्याने शहर पोलिसांनी नववर्षाच्या जल्लोषासाठी कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत डीसीपी, एसीपीसह ८० पोलिस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात तब्बल ८०० पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त राहणार आहे. यासह गुन्हेशाखा व वाहतुक शाखेची स्वतंत्र पथके सुध्दा तैनात असतील. विशेष म्हणजे मद्यपी वाहन चालकांची लगाम कसण्यासाठी ठिकठिकाणी ड्रंक अँड ड्राईव्ह मोहिम राबविण्यात येणार आहे.

३१ डिसेंबर म्हटलं की बहुतांश नागरिक जल्लोषासाठी रस्त्यावर येतात. शहरातील हॉटेल, बार, मॉल हाऊस फुल्ल असतात. भरधाव वेगाने रस्त्यावर धुमस्टाईलने वाहने चालविणाऱ्यांचा धुमाकूळ सुध्दा शहरात होत असतो. अशा परिस्थिती कुठलीही अनुचित घडना घडू नये, तसेचकायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नयेम्हणून प्रभारी पोलिस आयुक्त डीसीपी कल्पना बारवकर यांनी ३१ डिसेंबरला पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत सर्यिकीळद वाजतापासून ते १ जानेवारीच्या पहाटे ५ वाजेपर्यंत ३ डीसीपी, ५ एसीपी, पीआय / एपीआय/ पीएसआय अशा ८० अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात तब्बल ८०० पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे. यासह गुन्हे व वाहतुक शाखेची विविध पथकांची शहरात फिरती गस्त राहिल. प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रमुख चौकांमध्ये बॅरिगेट लाऊन नाकाबंदी करण्यातयेणार आहे. स्थानिक पोलिसांसह नियंत्रण कक्षाची सीआर मोबाइल, डायल ११२ मोबाइल व दामिनी पथक सुध्दा आयुक्तालयाच्या हद्दीत गस्त घालतील. विशेष म्हणजे मद्यपी वाहन चालकांची लगाम कसण्यासाठी ठिकठिकाणी ड्रंक अँड ड्राईव्ह मोहिम राबविण्यात येणार आहे.

**शहरातील तिन्ही उड्डाणपुल बंद**

३१ डिसेंबरला मद्यधुंद अवस्थेत रस्त्यावर धुम स्टाईने वाहने चालविणाऱ्यांची संख्या बरीच आहे. शेकडो युवक नशे रस्त्यावर स्टंट रायडींग करतात. यातूनच अपघाताच्या घटना होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे वाहतुक विभागाचे एसीपी संजय खताळे यांनी ३१ डिसेंबरला सायंकाळी ६ ते सकाळी ५ वाजेपर्यंत शहरातील पंचवटी, इर्विन चौक ते राजापेठ, राजापेठ ते नंदा मार्केट, कुशल ऑटोकडे जाणारा तिहेरी उड्डानपुल बंद करण्याची अधिसुचना जारी केली आहे.–

# नॉयलन मांजा उठला नागरिकांच्या जीवावर

## अंजनगाव सुर्जीत अनेक घटना, पोलिसांनी कारवाई करण्याची गरज

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३० अंजनगावसुर्जी –** पतंग उत्सव काळात पतंग उडविण्यासाठी नॉयलन मांजा वापर व विक्रीवर सर्वत्र बंदी असताना शहरात मात्र अनेक पतंग विक्री करणारे व्यावसायिक हा मांजा विक्री करत असल्याने युवक त्याचा सर्रास वापर करत असल्याने गळा कापणे,हात पाय व त्याची बोटं कापणे व शरीराच्या इतर भागास इजा पोहचणे इत्यादी प्रकार मोठ्या प्रमाणात घडत असून पोलिसांनी यावर तातडीने कारवाई करण्याची गरज असल्याची मागणी होत आहेसद्या दोन महिन्यांचा पतंग उडविण्याचा उत्सव जोरात सुरू असल्याने आकाशात पतंग उत्सव पाहायला मिळतो परंतु या उत्सवात नॉयलन मांजाचा सर्रास वापर नागरिकांच्या जीवावर बेतनारा ठरत असून शहरातील अनेक दवाखान्यात याबाबत रुग्ण येत आहेत शुक्रवारी (ता.२७) येथील गुलजारपुरा भागातील डॉ युवराज पाटील यांच्या दवाखान्यात तर एक सतरा ते अठरा वयाचा युवक रुग्ण असा आला की या नॉयलन मांजा मुळे त्याच्या हाताची करंगळी थेट हाळासह कापल्या गेली तेव्हा त्यावर डॉक्टरांना मोठी सर्जरी करावी लागली शिवाय गेल्या आठ दिवसात त्यांच्याकडे तीन ते चार पेशंट शरीराचा भाग कापल्याने उपचारासाठी दवखण्यात आल्याचे प्रसंग घडल्याचे समजले याशिवाय शहरातील अनेक दवाखान्यात असे नॉयलन मांजाने कापल्याने उपचारार्थ गेल्याच्या पेशंटची संख्या मोठी असल्याचेही समजले पतंग उत्सवात सध्या धाग्यांचा वापर करा नॉयलन मांजा चा वापर करू नका असे कडक निर्देश असून या मांजा



विक्री व वापरावर बंदी घालण्यात आली असताना शहरात अनेक व्यावसायिक याची चोरून विक्री करत आहेत यावर पोलिसांनी कारवाई करावी आणि जे युवक याचा वापर करतांना आढळला तर त्यावर किंवा युवक अल्पवयीन असल्यास त्यांच्या पालकांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे

**तातडीने कारवाई केली जाईल**

– नॉयलन मांजा वापर व विक्रीवर बंदी असून लोकांनी पतंग उत्सवात त्याचा वापर न करता साद्या धाग्यांचा वापर करावा जर कोणी विक्रेता पतंग विक्रीच्या आड हा मांजा विक्री करतांना आढळल्यास त्यांच्यावर कडक करावी केल्या जाईल शिवाय पालकांनी सुद्धा आपला अल्पवयीन मुलगा पतंग उडवताना या मांजाचा वापर करत असेल तर त्याला आडकाठी करावी मांजा विक्री व वापर यावर तातडीने कारवाई केल्या जाईल

**प्रकाश अहिरे** पोलीस निरीक्षकअंजनगावसुर्जी

**विक्रीवर कडक कारवाई व्हावी–** नॉयलान मांजा मुळे कापण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत असून पतंग उत्सवात वापर करणाऱ्यांना हा मांजा सहज विकत मिळत असल्याने त्याचा सर्रास वापर सुरू आहे त्यामुळे बंदी असताना विक्री व वापर सुरू राहणे यामुळे एखादी जीवघेणी घटना घडू शकते त्यामुळे या मांजाच्या विक्रीवरच कडक कारवाई व्हावी जेणेकरून तो वापर करणाऱ्यांना मिळणारच नाही तेव्हा कुठेतरी याचा वापर बंद होईलडॉ युवराज पाटीलशहर सरचिटणीस वैद्यकीय आघाडी भाजपा

**पक्षांच्या जीवालाही धोका–** या मांजा मुळे नागरिकांनाच नाही तर आकाशात उडणाऱ्या पक्षांनाही मोठी झळ पोहोचत असून अनेक पक्षी या नॉयलान मांजामुळे पंख चीरल्याने मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडल्या त्यामुळे या मंजाच्या वापर व विक्रीवर कडक करावी व्हावी अशी पक्षीप्रेमींची मागणी आहे

## कॅमेरा, रोल, ॲक्शन....

# शिक्षणमहर्षी भाऊसाहेब चित्रपटाचा निर्माता रविराज देशमुख यांच्याहस्ते शुभारंभ

### राष्ट्रीय जंगी किसान शंकर पटात पहिल्या सिनचे शूटिंग; अनेक कलाकारांची उपस्थिती



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०तिवसा–** देशाचे पहिले कृषिमंत्री शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शिक्षणक्षेत्रात खूप मोठे योगदान असून यावर आजपर्यंत कुठलाच चित्रपट प्रदर्शित झाला नाही. त्यांच्या या विशाल योगदानाची माहिती हि जनमाणसापर्यंत पोहोचविण्याचे कार्य हिम्मत फिल्म प्रोडक्शन प्रस्तुत व रविराज देशमुख निर्मित शिक्षणमहर्षी भाऊसाहेब'' या चित्रपटातून करण्यात येणार आहे. या उल्लेखनीय चित्रपटाचा शुभारंभ निर्माता रविराज देशमुख व सौ. गायत्रीताई देशमुख यांच्याहस्ते तिवसा येथे हिम्मत फाऊंडेशन च्या वतीने आयोजित राष्ट्रीय भव्य जंगी किसान शंकर पटामध्ये करण्यात आला. यावेळी दिग्दर्शक राहुल वानखडे, कार्यकारी निर्माता सुबोध देशमुख व सर्व टीमच्या वतीने प्रोडक्शन सेटअप सुद्धा ठेवण्यात आला होता. सर्वप्रथम श्री गणपती बाप्पांचे व शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन व आरती करण्यात आली. यावेळी श्री शंतनूभाऊ देशमुख (प्रदेश सचिव किसान आघाडी ), सचिन इंगळे (पश्चिम विदर्भ युवा प्रमुख, भाजपा ओबीसी मोर्चा), श्री अमित बाभुळकर (मा. शहराध्यक्ष, भाजप तिवसा), राहुल वानखडे (डायरेक्टर, शिक्षणमहर्षी भाऊसाहेब), श्याम भाऊ नरखेडकर, उमेशभाऊ श्रीखंडे, संतोष भाऊ मठीये, मनोज भाऊ खवड (शहराध्यक्ष वलगाव भाजपा), गोपी भाऊ वेरुळकर, गोपालभाऊ राठोड (किसान आघाडी प्रदेश कार्यकारिणी सदस्य), नानाभाऊ राणे (भातकुली भाजप तालुका अध्यक्ष), प्रतीक सावळे, विनोदभाऊ महल्ले, यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दिग्दर्शक राहुल वानखडे यांनी मान्यवरांच्या हस्ते कॅमेरा, रोल, ॲक्शन च्या सूचना देताच या चित्रपटाच्या शूटिंग ला सुरुवात झाली. यावेळी सहभागी कलाकारांनी पहिल्या सिन मध्ये उल्लेखनीय प्रस्तुती देऊन उपस्थित नागरिकांना मंत्रमुग्ध केले. दिग्दर्शक राहुल वानखडे यांनी सहभागी कलाकारांना चित्रपटातील डॉयलॉग सांगून कलाकारांना अभिनय सादर करायला लावले.

### दिग्दर्शक राहुल वानखडे यांच्या 'ॲक्शन' वर कलाकारांची उल्लेखनीय प्रस्तुती

**डॉ. पंजाबराव देशमुख यांची शैक्षणिक चळवळ शिक्षणमहर्षी भाऊसाहेब'' चित्रपटातून देशभरात पोहोचविणार: रविराज देशमुख**

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर आधारित ''शिक्षणमहर्षी भाऊसाहेब'' हा चित्रपट फक्त एक चित्रपट नसून देशाच्या शिक्षणक्षेत्रात भाऊसाहेबांचे योगदान किती मोलाचे आहे, यावर प्रखरतेने प्रकाश टाकणारा सिनेमा आहे. या चित्रपटाचा आज शुभारंभ झाला असून यामध्ये ग्रामीण भागातील कलाकारांना संधी देण्यात आहे. हा चित्रपट फक्त मराठी मध्येच नाही तर हिंदी मध्ये सुद्धा उपलब्ध राहणार असून हा चित्रपट देशभरातील सर्व सिनेमागृहात प्रदर्शित करण्याचा आमचा मानस असून त्यासाठी सर्व टीम काम करत आहे. असे प्रतिपादन यावेळी रविराज देशमुख यांनी केले.

# जि. प. शाळेच्या २२ विद्यार्थ्यांना विषबाधा

### मोर्शी तालुक्यायील अडगाव येथील घटना

### वैद्यकीय पथक गावात दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०मोर्शी –** मोर्शी तालुक्यातील अडगाव येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील जवळपास २० ते २२ विद्यार्थ्यांना पोषण आहारातून विषबाधा झाल्याची घटना रविवारी २९ डिसेंबर रोजी उघडकीस आली. या हृदयद्रावक घटनेमुळे गावात एकच खळबळ उडाली असून पालक वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.प्राप्त माहितीनुसार अडगाव येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असून या ठिकाणी गावातील ८० विद्यार्थी वर्ग १ ते ४ पर्यंत शिक्षण घेत आहेत. यामध्ये ६ ते १० वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या शाळेचा वेळ सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत असा आहे. काल २८ डिसेंबर रोजी गावातील विद्यार्थी नेहमीप्रमाणे शाळेत गेले असता दररोज देण्यात येणाऱ्या पोषण आहारात विद्यार्थ्यांना खिचडी व मोट देण्यात आली. दुपारी १ वाजता शाळेला सुट्टी झाल्यावर सर्व विद्यार्थी आपापल्या घरी परतले. मात्र रात्री ११ ते ४८१२ वाजताच्या दरम्यान २२ विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, संडास पालकवर्गात कमालीची धावस्यामुळे झाली. या घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते प्रशांत डहाणे यांनी जिल्हाआरोग्य अधिकारी आसोले यांना दिली. त्यांनी लगेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेश जयस्वाल व विचोरी येथील प्राथमिक आरोग्यकेंद्राची टीम घटनास्थळी रवाना केली. या अगोदर गावातील डॉ. गणोरकर यांनी सुद्धा विषबाधा रुग्णांवर औषधोपचार सुरू केला होता.केंद्राची टीम घटनास्थळी रवाना केली. या अगोदर गावातील डॉ. गणोरकर यांनी सुद्धा विषबाधा रुग्णांवर औषधोपचार सुरू केला होता.

# तुटलेल्या पुलांच्या सर्वेक्षणाचे आदेशच नाहीत

### पुरामुळे हानी न झाल्याचा प्रशासनाचा दावा गतवर्षीच्या पूर हानीचा निधी अद्यापही अप्राप्तच

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३०अमरावती**

१६यावर्षी जिल्ह्यात पाऊस अधिक झाला असून ग्रामीण भागातील रस्त्यावर त्याचा परिणाम झाला आहे, मात्र शासनाकडून पूरहानीमुळे खरडलेले रस्ते किंवा तुटलेल्या पुलाच्या सर्वेक्षणाचे अद्यापही आदेश देण्यात आलेले नाही. त्यामुळे बांधकाम विभागाकडून कुठलेही नियोजन करण्यात आले नाही. मागील वर्षीच्या पूर हानीचा पैसा अद्यापही जिल्हा परिषदेला अप्राप्तच आहे.यंदा पावसाळा जोरदार झाला तसेच पाऊस अनेक दिवस लांबलासुद्धा. मुसळधार पावसामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांना काही अंशी खड्डे पडले असले तरी ते पूरहाणीच्या कक्षेत येत



नाही, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. दरवर्षी प्रामुळे होणाऱ्या नुकसानाचे सर्वेक्षण करण्याचे आदेश शासनाकडून देण्यात येतात, यंदा मात्र अमरावती जिल्हा परिषदेला शासनाकडून तसे कुठलेही आदेश प्राप्तझालेले नाहीत. पर्यायाने बांधकाम विभागाकडून कुठलेही नियोजन करण्यात आले नाही. गतवर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरडलेले रस्ते व पुलाच्या तात्पुरत्या १४ कोटीची मागणी बांधकाम विभागाकडून करण्यात आली होती, तरी अद्यापपर्यंत एक रुपये ही बांधकाम विभागाला प्राप्त झालेला नाही. यावर्षी शासनाकडून सर्वेक्षणाचे आदेश देण्यात आलेले नाही. त्यामुळे आदेश देण्यात आतधकाम विभागाने कुठलेही नियोजन केले नाही.

यंदा पावसाळा जरी अधिक झाला असला तरी रस्ते व पुलाचे नुकसान झालेले नाही तसेच शासनाकडून सर्वेक्षणाचे आदेश नाहीत.

दिनेश गायकवाड, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जि.प.

# संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनी संपन्न

## जिल्ह्यातून वरुड, मोर्शी, दर्यापूर रहाटगाव आय टी आय ने मारली बाजी


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती**

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत राबविल्या जाणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षण हे प्रात्यक्षिकाभिमुख असते यातूनच औद्योगिक क्षेत्राला मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाचा पुरवठा केला जातो. संस्थेत मिळणाऱ्या तांत्रिक कौशल्याबरोबरच प्रशिक्षणार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पूरक उपक्रम राबविणे व प्रशिक्षणार्थ्यांच्या कौशल्यास तसेच व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने विविध कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.या धर्तीवरच सदरहू संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनीचे आयोजन दि.२७ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यातून शेकडो मॉडेलची निर्मिती प्रशिक्षणार्थ्यांकडून करण्यात आली होती.जिल्हास्तरावर अभियांत्रिकी व्यवसायामधून एकूण ७ मॉडेल व बिगर अभियांत्रिकी व्यवसायमधून ३ मॉडेलची जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनीमध्ये निवड करण्यात आली.अभियांत्रिकी गटातून वरुड येथील पुंडलिक महाराज आय टी आय च्या प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या वुमेन सेफ्टी (इलेक्ट्रिशियन )या मॉडेलला प्रथम क्रमांक,दुसरा क्रमांक रोप मेकिंग ( फिटर ) मोर्शी आय टी आय, तिसरा क्र.ई व्ही चार्जिंग ( इलेक्ट्रिशियन )एस एल आय टी आय बडनेरा,चौथा क्र.स्मार्ट रूम सिस्टीम ( इलेक्ट्रिशियन )मोझरी आय टी आय, पाचवा क्र.वॉल वॉच (फिटर )अमरावती आय टी आय,सहावा क्र.लाईन टेस्टर (आय टी ई एस एम ) अंजनगाव सुर्जी आय टी आय,सातवा क्र.पोल्युशन कंट्रोलर (वायरमन ) धारणी आय टी आय यांनी कौशल्य व गुणवत्तेच्या आधारावर यश संपादन केले तर बिगर

### पुष्पा लूक ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

अभियांत्रिकी गटातून प्रथम क्र.रिवाईन्ड अँड रिडिझाईन (फॅशन डिझाईन अँड टेक्नॉलॉजी ) मोर्शी आय टी आय,द्वितीय क्र.क्यू आर कोड जनरेटर ( कोपा ),दर्यापूर आय टी आय तर तिसरा क्र.आरी फ्युजन वर्क (फॅशन डिझाईन ) राहाटगाव आय टी आय या मॉडेलनी बाजी मारली.ही तंत्र प्रदर्शनी शासकीय आय टी आय च्या दोन भव्य हॉल मध्ये आयोजित करण्यात आली होती. बिगर अभियांत्रिकी गटातून अंजनगाव सुर्जी आय टी आय च्या बेसिक कोस्मेटलोजी या व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांनी साऊथ गॉड्स लूक मधील पुष्पा २ या कलाकृतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ही कलाकृती परीक्षकांच्या निकषावर पात्र जरी ठरली नसली तरी तंत्र प्रदर्शनी बघणाऱ्या विद्यार्थी, पालकवर्गासाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू होता. या कलाकृतीसाठी बेसिक कोस्मेटलोजी या व्यवसायाच्या शिल्प निदेशीका कु. बानोरे मॅडम व प्रशिक्षणार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.



# चांदूर रेल्वे नगर परिषदच्या पाणीपुरवठ्याचा वीजपुरवठा महावितरणतर्फे खंडित

## विद्युत देयक प्रलंबित असल्यामुळे विद्युत पुरवठा शहराच्या इतिहासात पहिल्यांदा खंडीत

## रविवारी शहरात आले नाही नळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०चांदूर रेल्वे –** चांदूर रेल्वे नगर परिषदच्या पंप हाऊस येथील विद्युत पुरवठा महावितरणतर्फे शनिवारी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास खंडित करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विद्युत देयक प्रलंबित असल्यामुळे विद्युत पुरवठा खंडीत झाल्याची माहिती महावितरणतर्फे मिळाली असुन शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच पंप हाऊसचा विद्युत पुरवठा २४ तासांच्या वर अजुनही खंडीत आहे. यामुळे रविवारी शहरवासीयांना पाण्यापासून वंचित राहावे लागले आहे. यावरून नगर परिषदचा बेजबाबदारपणा समोर आला आहे.चांदूर रेल्वे शहराला सध्यास मालखेड तलावावरून पाणीपुरवठा होत आहे. मालखेड तलावावरून पाणी शहरातील पंप हाऊस येथे जाते व येथून पाणी जलशुद्धीकरण केंद्रावर पाठविले जाते. आणि तेथून संपूर्ण शहराला पाणीपुरवठा होतो. मात्र पंप हाऊस येथील पाणीपुरवठा हा विज देयके प्रलंबित असल्यामुळे महावितरणतर्फे खंडित करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

यामुळे रविवारी शहरातील इंदिरा नगर, मंगलमुर्ती नगर, गुलमोहर कॉलनी, मेहेरबाबा कॉलनी, को - ऑपरेटीव्ह बँक कॉलनी या भागात होणारा पाणीपुरवठा झालाच नाही. अशामुळे या भागातील नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागले. नगर परिषदेत नगराध्यक्ष, उपाध्यक्ष, नगरसेवक हे लोकप्रतिनिधी असतांना २४ तासांच्या वर कधीही पाणीपुरवठा खंडित राहिला नाही. मात्र स्थानिक नगर परिषदमध्ये २७ डिसेंबर २०२१ पासून संपूर्ण कारभार हा प्रशासकाकडे असतांना प्रशासकाच्या काळात




चांदूर रेल्वेच्या इतिहासात पहिल्यांदाच २४ तासांच्या वर पाणीपुरवठ्याचा विद्युत पुरवठा खंडित राहिला आहे हे विशेष. त्यामुळे याला दोषी कोण ? याचा वरिष्ठांनी तपास करणे गरजेचे झाले आहे.

यावरून नगर परिषदेचा ढिसाळ कारभार उघडकीस आला आहे.

### ५ लाखांच्या जवळपास विद्युत देयक प्रलंबित

पंप हाऊसचे विद्युत देयक ५ लाखांच्या जवळपास प्रलंबित आहे. यासंबंधी नगर परिषदला सुचना सुध्दा दिली होती. यानंतर आम्ही सदर विद्युत पुरवठा खंडीत केला असल्याची प्रतिक्रीया महावितरणचे सहाय्यक अभियंता (शहर) दिक्षांत कवाडे यांनी दिली.

### तांत्रिक समस्येमुळे पाणीपुरवठा बंद

तांत्रिक समस्येमुळे शहरातील पाणीपुरवठा हा बंद असून लवकरच सुरळीत करण्यात येणार असल्याची माहिती नगर परिषदेचे पाणीपुरवठा अभियंता आशिष कुऱ्हाडे यांनी दिली. तर मुख्याधिकारी यांना प्रतिक्रिया करिता कॉल लावला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# कॉँग्रेसवाले फक्त फोटो काढायला येतात, मनमोहन सिंग यांच्या अस्थी विसर्जनाला कोणीही आलं नव्हतं



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०नवी दिल्ली–** माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे स्मारक आणि अंत्यसंस्कार यावरून अजूनही राजकारण सुरू आहे. डॉ. मनमोहन सिंग यांच्या स्मारकाच्या उभारणीसाठी जमीन का दिली जात नाही आणि त्यासाठी दिरंगाई का केली जात आहे, असा सवाल कॉँग्रेस सातत्याने उपस्थित करत आहे. तसेच निगम बोध घाटावर झालेल्या अंत्यसंस्कारावरही कॉँग्रेसने प्रश्न उपस्थित केले आहेत. यावर प्रतिक्रिया देताना केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी कॉँग्रेसचे लोक फक्त फोटो काढण्यासाठी येतात, मात्र डॉ. मनमोहन सिंग यांच्या अस्थी विसर्जनाला कोणीही आलं नव्हतं असं म्हटलं आहे.कॉँग्रेसने उपस्थित केलेल्या प्रश्नांवर भाजपाने जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. या मुद्द्यावर कॉँग्रेस फक्त राजकारण करत आहे, असं भाजपच्या बाजूने सांगण्यात आलं आहे. तसेच भाजपाने यापूर्वीच डॉ. मनमोहन सिंग यांचे स्मारक उभारण्याबाबत मंत्रिमंडळात निर्णय झाल्याचं सांगितलं आहे. निगम बोध घाटात मात्र अंत्यसंस्कारावर प्रश्न उपस्थित करून कॉँग्रेस फक्त राजकारण करत आहे असं म्हटलं.

केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांनी कॉँग्रेसच्या आरोपांवर हल्लाबोल करत कॉँग्रेस बिनबुडाचे आरोप करत असल्याचं म्हटलं. डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार करण्यात आले. ज्या स्मारकाबाबत बोललं जात होतं ते स्मारकासाठी सरकार तयार आहे, परंतु सध्याची परिस्थिती अशी आहे की, त्यात काही अडचणी आहेत. गेले तीन दिवस मुसळधार पाऊस पडत होता, त्यामुळे मोकळ्या जागेत अंत्यसंस्कार करता येत नव्हते.

हरदीप पुरी म्हणाले की, कॉँग्रेस सरकारच्या काळातही देशाच्या अनेक माजी पंतप्रधान आणि राष्ट्रपतींचे अंत्यसंस्कार एकता स्थळावर झाले आहेत, जिथे त्यांचे स्मारकही बांधले गेले आहे. कॉँग्रेसची इच्छा असती तर डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर त्या ठिकाणी अंत्यसंस्कार करता आले असते कारण ती जागा आधीच चिन्हांकित आहे आणि त्या ठिकाणी दोन स्मारक बांधण्यासाठी जागा शिल्लक आहे.

माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कुटुंबीयांचा अपमान झाल्याच्या मुद्द्यावर प्रतिक्रिया देताना हरदीप सिंग पुरी म्हणाले की, मनमोहन सिंग यांच्या कुटुंबीयांचे वाहन कोणत्याही ताफ्यामुळे थांबलेलं नाही आणि निगम बोध घाटावरही त्यांच्यासाठी पूर्ण व्यवस्था करण्यात आली. कॉँग्रेस फक्त राजकारण करत आहे. कॉँग्रेस नेते फक्त फोटो काढण्यासाठी तिथे पोहोचतात, पण आज जेव्हा डॉ. मनमोहन सिंग यांच्या अस्थींचं विसर्जन झालं, तेव्हा कॉँग्रेसचा एकही नेता तिथे पोहोचला नाही.

# बडनेरा येथे वास्तव्यातील रोहिंग्यांना भारतातून हद्दपार करा

### हिंदूसुर्य प्रतिष्ठानची बडनेरा पोलिसांकडक निवेदनातून मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अंजनगाव बारी–** बडनेरा परिसरातील झोपडपट्टी भागात अनेक बांग्लादेशी व रोहिम्या घुसखोरांचे स्थाई वास्तव्य आहे. त्यांनी अवैध अतिक्रमण ' करून अनधिकृत झोपडपट्टी निर्माण केली आहे. त्यांच्याकडे अनधिकृत मिळवलेले भारतीय नागरिक खोटे प्रमाणपत्र, आधारकार्ड, रेशन कार्ड आहेत. जे देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हानिकारक आहे. त्यांना भारतातून हद्दपार करण्याची मागणी हिंदूसूर्य प्रतिष्ठानच्यावतीने बडनेरा पोलीस निरीक्षकांना निवेदनातून केली आहे.

स्थानिक सामाजिक आरोग्यासाठी हे घुसखोर फार आपायकारक ठरु शकतात. सध्या बांग्लादेश परिस्थितीप्रमाणे भविष्यात हे घुसखोर आपल्या शहराच्या काय सखो सुव्यवस्थेला एक मोठे अवाहन ठरु शकतात. या घूसखोरांची अपराधी मनोवृत्ती व गुन्हेगार र प्रवृत्ती ही आपल्या शहराचा सामाजिक सलोखा धार्मिक, साम्प्रदायिक एकोपा बिघडविण्याचे कारण ठरु शकतो. शिवाय स्थानिक भूमिपुत्रांच्या रोजगारांवर हे घूसखोर घाला घालत आहेत. स्थानिक संसाधनावर याचा ताण पडू शकतो. या बांग्लादेशी घुसखोर, रोहिंग्या घूसखोरांमुळे बडनेरा शहराचा डेमोग्राफीक चेंज होत आहे. त्यामुळेया घूसखोरांवर कार्यवाही करुन बडनेरा शहराचे या बांग्लादेशी घोसखोरांपासून, रोहिंग्या घूसखोरांपासून भविष्य सुरक्षित करावे, अशी मागणी हिंदूसुर्य प्रतिष्ठान (महाराष्ट्र राज्य) निवेदनातून केली आहे.निवेदन देणाऱ्यांमध्ये प्रदीप सोळंके, सिद्ध सोळंके, गुरुदयालसिंग बावरी, करण सोळंके, अमर सरोदे, राहुल वगारे, सागर पवार, श्रीरंग बडनेरकर, आशुतोष जोशी, आदित्य राजपूत, आशुतोष पंजवानी, भोला पवार, दत्ता पवार, गोलू पवार, बिडू सोळके, गोलू बोयत, बंटी सोळंकी, अजय कावरे, अर्थव गायकवाड आदी उपस्थित होते.

# ना जमीन दिली ना भारतरत्न, कॉँग्रेसने कधीच नरसिंह रावांचा आदर केला नाही; भावाची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०नवी दिल्ली–** भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे २६ डिसेंबर २०२४ रोजी दिल्लीत निधन झाले. २८ डिसेंबर रोजी त्यांच्यावर दिल्लीतील निगमबोध घाटावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, आता त्यांच्या समाधीस्थळावरुन नवा वाद सुरू झाला आहे. या वादावरुन माजी पंतप्रधान दिवंगत पीव्ही नरसिंह राव यांचे भाऊ मनोहर राव, यांनी कॉँग्रेसवर निशाणा साधला आहे.

### कॉँग्रेसने नरसिंहरावांना किती मान दिला?

मीडियाशी संवाद साधताना मनोहर राव म्हणतात, कॉँग्रेसने २० वर्षे मागे वळून पाहावे. त्यांनी पीव्ही नरसिंह रावांना किती आदर दिला? कॉँग्रेसने नरसिंह राव यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अंत्यविधीसाठी जमीन दिली नाही, त्यांचा एक पुतळाही कधी बांधला नाही, त्यांना भारतरत्नही दिला नाही. कॉँग्रेसने तर नरसिंह राव यांचे पार्थिव ठेवण्यासाठी पक्ष कार्यालयाचे कुलूपही उघडले नव्हते. मनमोहन सिंग यांच्या अंत्यसंस्कारात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान...संपूर्ण मंत्रिमंडळ उपस्थित होते. मात्र नरसिंह राव यांच्या अंत्यसंस्काराला कोणीही आले नाही. सोनिया गांधी एआयसीसीच्या अध्यक्षा होत्या. त्या हैदराबादला आल्या नाही, अशी टीका त्यांनी केली.



### मनमोहन सरकारमध्ये नरसिंह राव यांना काय मिळाले?

मनोहर राव पुढे म्हणतात, डॉ. मनमोहन सिंग यांना त्यांच्या कार्यकाळात खूप प्रसिद्धी मिळाली, कारण नरसिंह राव यांनी त्यांना अर्थमंत्री म्हणून काम करण्याचे स्वातंत्र्य दिले होते. या काळात मनमोहन सिंग यांनी अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. देशाला आर्थिक संकटातून वाचवले. नरसिंह राव आणि मनमोहन सिंग यांची जोडी गुरु-शिष्याची जोडी होती. पण, मनमोहन सरकारमध्ये नरसिंह राव यांना काय मिळाले? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

### भाजप मनमोहन सिंग यांचा आदर करेल

मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल आम्ही शोक व्यक्त करतो. त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांबद्दल आमच्या मनात संवेदना आहेत. त्यांच्या स्मारकासाठी भाजप नक्कीच जमीन देईल. काही औपचारिकता आहेत, ज्या कॉँग्रेसने पूर्ण केल्या पाहिजेत, असेही त्यांनी यावेळी म्हटले.

# 'जलजीवन'ची सहा कोटींची देयके थकली

## सहा महिन्यांपासून शासनाकडून निधीचा नाही पत्ता




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती :** जिल्हा परिषदजिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा अंतर्गत राबविल्या जात असलेल्या जलजीवन मिशन योजनेची कामे रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जलजीवन अंतर्गत झालेल्या कामांची सहा कोटींची देयके गेल्या सहा महिन्यांपासून थकली असल्याचे समोर आले आहे. ही देयके मिळावीत, यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने राज्य शासनाकडे निधी मागणीचे पत्र पाठविले आहे.

जिल्ह्यात ६६६ गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत ६६६ पाणीपुरवठा योजनेसाठी सुमारे २६२ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला. ही कामे पूर्ण करण्यासाठी ३० सप्टेंबरच्या मुदतीस पुन्हा सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. आता या योजनेसाठीमार्च २०२५ ची डेडलाईन आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यात योजनेंतर्गत ८० ते ९० टक्के योजना पूर्ण झाल्या आहेत. यापैकी बहुतांश योजनांमधून प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू झाला. योजना पूर्ण करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाचे प्रयत्न सुरू असताना 'दुसरीकडे झालेल्या कामांची देयके र ख ड ल ी. सहामहिन्यांपासून झालेल्या कामांची देयके दिलेली नसल्याने कंत्राटदाराची देयिकेही थांबली आहेत. परिणामी कामांची गतीही मंदावली आहे. निधी उपलब्ध नसल्याने योजनांची कामे धिम्यागतीने सुरू आहेत.शासनाकडून जलजीवन मिशन योजनेसाठीच्या सुमारे २६२ कोटींच्या आराखड्यापैकी आतापर्यंत १८७ कोटी रुपयांचा निधी मिळाला. यानंतर मात्र उर्वरित निधी मिळालेला नाही. अद्यापही शासनाकडून निधी प्राप्त झाला नाही. लाडकी बहीण योजनेसाठी वर्ग झाल्याने विभागाकडे निधीची वानवा असल्याचे बोलले जात आहे. महायुतीचे सरकार स्थापन झाले असून, पाणीपुरवठा खात्याला मंत्रीदेखील मिळाले; मात्र निधीबाबत कोणत्याही हालचाली नसल्याने कंत्राटदार मात्र अडचणीत सापडले आहेत.

### निधी मिळाल्याशिवाय पर्याय नाही

जलजीवन मिशन अंतर्गत योजनांच्या झालेल्या कामांपोटी जवळपास आठ कोटींची बिले थकली आहेत. ती मिळावी, यासाठी विभागाकडून शासनाला पत्र देण्यात आले असून, पाठपुरावाही सुरू आहे. शासनाकडून निधी उपलब्ध होताच थकीत देयके अदा करण्यात येणार असल्याचे पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी सांगितले.

# शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर म्हणतात

## अजितदादा २० हजार मतांनी पराभूत, १५० मतदारसंघात गडबड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० मुंबई –** विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले. निकालानंतर विरोधकांकडून ईव्हीएमवर संशय व्यक्त करण्यात आले होते.दोन दिवसापूर्वी निवडणूक आयोगाने ईव्हीएमवर स्पष्टीकरण दिले आहे.

दरम्यान, आता पुन्हा एकदा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार उत्तम जानकर यांनी निवडणुकीच्या निकालावर संशय व्यक्त केला आहे. 'बारामतीमध्ये अजित पवार यांचा २० हजार मतांनी पराभव होणार होता, या निवडणुकीत १५० जागांवर गडबड केली असल्याचा दावाही जानकर यांनी केला.

आमदार उत्तम जानकर म्हणाले, आता जी निवडणूक घेतली आहे. या निवडणुकीत १५० मतदारसंघात गडबड केली आहे. यांचे मतदारसंघ किती आलेत ही माहिती काढल्यानंतर समोर आली आहे. यात अजितदादा सुद्धा २० हजार मतांनी पराभूत आहेत. अजितदादा यांनी जी १ लाख ८० हजार मत पडली आहेत त्यामध्ये वन थर्ड असं येथेही लावले होते. त्यामुळे युगेंद्र पवार यांची मत ८० हजार प्लस ६० अशी एक, चाळीस आहेत. आणि त्यांच्यामधील ६० वजा होतात म्हणजे अजिदादा एक लाख वीस वर राहतात. अजित पवार यांचे फक्त १२, शिंदेंचे १८ तर भाजपचे ७७ आमदार निवडून येणार होते. असे सगळे मिळून १०७ आमदार आहेत आणि दोन ते तीन अपक्ष आहेत, असा मोठा दावा जानकर यांनी केला.



मी प्रत्येक मतदारसंघाचा अभ्यास केला आहे. जयकुमार गोरे यांच्याबाबतीत सुद्धी एकास पाच असं लावण्यात आलं होतं. गोरे यांना एक लाख ४८ हजार मत आणि घाटगेंना एक लाख तीन हजार तर त्या ठिकाणी त्यांचीसुद्धी तीस हजार मत चोरली. ती जर वजा केली तर १० हजार मतांचा फरक आहे, असंही जानकर म्हणाले.

# थर्टी फर्स्ट; शेंदुरजनाघाट पोलिसांतर्फे 3 चेक पोस्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०शेंदुरजनाघाट–** थर्टी फर्स्ट व नववर्षाच्या स्वागताच्या बंदोबस्तासाठी शेंदुरजनाघाट पोलिस सज्ज झाले आहे. या बंदोबस्ताकरिता २ २ पोलिस अधिकारी व ३० अंमलदार तैनात केले जाणार असून, तीन ठिकाणी चेक पोस्ट उभारण्यात येणार आहेत. याशिवाय पेट्रोलिंगसाठी चार स्वतंत्र पथक तयार करण्यात आले आहेत.३१ डिसेंबर व नववर्षाच्या स्वागतासाठी बरीच आयोजने केली जातात. परंतु यादरम्यान कोणालाही त्रास होऊ नये, यादृष्टीने लोकांच्या सुरक्षिततेसाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशन हद्दीत पुसला,रवाळा व तिवसाघाट या तीन ठिकाणी नाकाबंदी केली आहे. शिवाय शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंगकरिता चार पथके तयार केली आहेत. दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांची ब्रीद ॲनालायझरने जागीच तपासणी करून त्यांची वाहने जप्त करण्यात येतील. तसेच सार्वजनिक ठिकाणी धामधूम करणाऱ्या लोकांवर साध्या वेशातील पोलिस नजर ठेवून राहणार असून, उपद्रव करणाऱ्या लोकांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. दरम्यान सरत्या वर्षाला निरोप व येणाऱ्या वर्षांचे स्वागत हर्षोल्हासात करत असताना कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता नागरिकांसह युवा वगनि घेण्याचे आवाहन शेंदुरजना घाटचे ठाणेदार दीपक माहडिक यांनी केले आहे.–

# स्वामी तिन्ही जगाचा आईला निरोप देताना नाना पटोले ढसाढसा रडले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०गोंदिया**

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी, ही म्हण आपण ऐकलीच असेल. याची प्रचिती भंडारा जिल्ह्यात आली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व साकोलीचे आमदार नाना पटोले यांच्या मातोश्री मीराबाई यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भंडारा जिल्ह्यातील सुकळी गाव येथे रविवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आपल्या आईचे पार्थिव पाहून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले भावनिक झाले होते. यावेळी नाना पटोले ढसाढसा रडले. राजकारणामध्ये एक कणखर नेतृत्व म्हणून ओळख असलेले नाना पटोले यांना असे रडताना पाहून अनेकांचा कंठ दाटून आला. त्यामुळे अंत्यसंस्कारासाठी आलेल्या सर्वांनीच आपल्या अश्रुंना वाट मोकळी करून दिली.

नाना पटोले यांच्या मातोश्री मीराबाई यांच्या अंत्यसंस्कारासाठी भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील अनेक मान्यवर नेत्यांनी हजेरी लावली. काँग्रेससह सर्वच राजकीय पक्षातील नेत्यांनी मीराबाई पटोले यांचे अंत्यदर्शन घेत त्यांना पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

अंत्यसंस्काराच्या वेळी नाना पटोले हे आपल्या आईसंदर्भातील आठवणी अनेकांना सांगताना दिसले. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीपूर्वी नाना पटोले यांनी आपल्या आईचे आवर्जुन आशीर्वाद घेतले होते. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतरदेखील नाना पटोले यांनी मातोश्रींचे आशीर्वाद घेतले. त्याचा फोटोही सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.




मीराबाई पटोले यांचे रविवारी पहाटे नागपूर येथे वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्काराप्रसंगी माजी मंत्री तथा भाजपचे आमदार डॉ. परिणय फुके, भंडारा-गोंदियाचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांच्यासह दोन्ही जिल्ह्यातील अनेक नेते, राजकीय पदाधिकारी उपस्थित होते. आमदार विजय वडेट्टीवार यांनी मीराबाई पटोले यांना श्रद्धांजली वाहिली. या कठीणप्रसंगी मी आणि माझे संपूर्ण कुटुंब पटोले कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहोत. ईश्वरचरणी प्रार्थना आहे की नाना पटोले आणि त्यांच्या कुटुंबाला या दुःखातून सावरण्याचे बळ मिळावे, असे वडेट्टीवार म्हणाले.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी देखील मीराबाई पटोले यांना श्रद्धांजली वाहिली. काँग्रेसच्या अनेक नेत्यांनीदेखील सोशल मीडियावर मीराबाई पटोले यांचा फोटो पोस्ट करत त्यांना श्रद्धांजली वाहिली. मीराबाई पटोले यांच्या पार्थिवावर भंडाऱ्याच्या सुकळी या स्वगावी चुलबंद नदीच्या तीरावर अंत्यसंस्कार करण्यात आले.भंडारा जिल्ह्यातील सुकळी हे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे मूळ गाव आहे. ग्रामीण परंपरेनुसार मीराबाई यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडले. नाना पटोले यांच्यासह त्यांचे भाऊदेखील यावेळी हजर होते.

# शिर्डीच्या साईबाबांबाबत वादग्रस्त वक्तव्य करणारे धीरेंद्र शास्त्री गजानन महाराजांच्या चरणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०शेगाव**

शिर्डीच्या साईबाबांबाबत वादग्रस्त वक्तव्य करणारे बागेश्वर धाम पीठाधीश्वर धीरेंद्र कृष्ण शास्त्री आज रविवारी विदर्भ पंढरी शेगाव नगरीत दाखल झाले. संत नगरी शेगाव येथील गजानन महाराज संस्थानला भेट देऊन ते गजानन महाराजांच्या समाधीस्थळी नतमस्तक झाले.आपल्या प्रवचन, समस्या पूर्ती कार्यक्रम, यामुळे देशभरात प्रसिद्ध आणि अधूनमधून वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत असणारे धीरेंद्र कृष्ण शास्त्री उत्तर महाराष्ट्रातील जळगाव खान्देश येथे आयोजित धार्मिक कार्यक्रमासाठी



दौऱ्यावर आले होते. आज रविवारी ते अल्पकालीन दौऱ्यावर शेगावात पोहोचले होते.

मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील गडा गावात असलेले 'बागेश्वर धाम' हे स्वयंभू हनुमानजींसाठी देश-विदेशात प्रसिद्ध आहे. बागेश्वर धाम ही अनेक तपस्वींची दैवी भूमी आहे, जिथे नुसते दर्शन घेऊन लोकांना बालाजी महाराजांचे आशीर्वाद मिळतात. येथे बालाजी महाराज एका अर्जाद्वारे तुमची समस्या ऐकतात आणि धामचे पीठाधीश्वर धीरेंद्र कृष्ण शास्त्री, ज्यांना जग बागेश्वर धाम सरकार या नावाने संबोधते, त्यांच्यामार्फत ते समस्यांचे समाधान मिळवतात.हेच धीरेंद्र कृष्ण शास्त्री आज संतश्रेष्ठ गजानन महाराजांच्या चरणी लिन होण्यासाठी संत नगरीत दाखल झाले होते. शेगाव येथे संत गजानन महाराजांचे दर्शन घेतले. केवळ एका तासापुरता त्यांचा हा दर्शन दौरा होता. यावेळी त्यांनी श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेऊन संस्थानच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करीत गजानन महाराज संस्थानतर्फे शेगाव आणि अन्य शाखांतर्फे वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती घेतली. शेगाव भेटीमागे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांचा हाच उद्देश होता, असे यावेळी सांगण्यात आले. मात्र या भेटीचा फारसा गाजावाजा करण्याचे आणि प्रसिद्धी करण्याचे टाळण्यात आले. पूर्व नियोजित वेळेपेक्षा उशिराने त्यांचे हेलिकॉप्टरने शेगाव परिसरात आगमन झाले.

जळगाव खांदेशच्या विमानतळावरून ते हेलिकॉप्टरने शेगावमध्ये पोहचले. माऊली अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये हेलीपॅड तयार करण्यात आले होते. खराब हवामानामुळे त्यांना शेगावात दाखल होण्यास विलंब लागला. यावेळी संत गजानन महाराज संस्थानकडून त्यांचे स्वागत सत्कार करण्यात आले. गर्दी लक्षात घेता जिल्हा पोलीस प्रशासनाने दौरा स्थळ मार्गावर तगडा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. दर्शनानंतर त्यांनी पुन्हा हेलिकॉप्टरने जळगावकडे प्रयाण केले.

# मानवी कवटी आढळल्याने खळबळ : बडनेरा जुनीवस्ती येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० बडनेरा**

बडनेरा शहरातील जुनी वस्ती परिसरातील बारीपुराजवळील पवार वाडी संकुलात रविवारी २९ डिसेंबर रोजी सकाळी मानवी कवटी आढळून आली. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. याबाबत माहिती मिळाल्यावर बडनेरा पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. त्यानंतर कवटी परीक्षणासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आली. पवार वाडी संकुल परिसरात नाली बांधण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी ट्रकमधून कन्हान वाळू टाकण्यात आली आहे. पाण्याच्या प्रवाहात आलेली ही कवटी वाळूत रुतून बसली असावी, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. दरम्यान, ही कवटी पुरुषाची आहे की महिलेची आणि मृत्यू नेमका कसा झाला, याचा तपास करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात परिक्षणानंतर ती फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठविण्यात येणार आहे.

# विवाहाच्या निमंत्रणासाठी वाढला सोशल मीडियाचा वापर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात दैनंदिन मानवी जीवनात आमूलाग्र बदल झाले आहेत. ज्या कामासाठी पैसा व वेळ वाया जायचा, अशा अनेक गोष्टी चुटकी सरशी काही वेळातच माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने साध्य केल्या जातात. आजघडीला शुभकार्य, लग्नाचे निमंत्रण सोशल मीडियाच्या माध्यमातून पाठविले जात आहे.लग्न जुळविण्यासाठी सर्वात आधी वधू-वरांचे गुण जुळविणे. नंतर साक्षगंध, लग्नाचा मुहूर्त



व त्यानंतर पत्रिकेचे स्वरूप एवढ्यापर्यंत विचार व्हायचा. त्यानंतर आप्तेष्टांकडे जाऊन निमंत्रण देण्याची प्रथा रूढ होती. मात्र, अलीकडे नातेवाइकांना व्हाट्सअपवरच आकर्षक पत्रिका अन् फोन करून किंवा व्हिडिओ कॉलिंगच्या माध्यमातून धडाधड निमंत्रण दिली जात आहेत.

लग्न म्हटला की, वधू-वरांकडील मंडळींची तीन-चार महिने आधीपासूनच तयारीची लगबग असते. लग्नपत्रिका अनोखी असावी, म्हणून आकर्षित पत्रिका देण्याकडे अनेकांचा कल असतो. मात्र, आता पत्रिकेचे स्वरूपच बदलले असून आप्तेष्ट किंवा मित्रपरिवाराला विवाह सोहळ्याचे आग्रहाचे निमंत्रण देण्यासाठी गावोगावी, घरोघरी जाऊन निमंत्रण देण्याची प्रथा आता कालबाह्य होण्याच्या मार्गावर असून, व्हाट्सअप, फेसबुकवरूनच लग्नाला यायचं हं..! असे म्हणत निमंत्रण देण्याची प्रथा आता रूढ होत असल्याचे दिसते.

**प्रिंटिंग व्यवसायाला फटका**

डिजिटल लग्नपत्रिका वापरल्यामुळे कमी वेळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचता येते. यामुळे मोबाइल संदेश यंत्रणेचा वापर वाढला आहे. परिणामी लग्नपत्रिका, निमंत्रण पत्रिका छपाईचा खर्च वाचत आहे. याचा फटका प्रिंटिंग प्रेस व्यवसायाला बसला आहे.

**जिव्हाळा झाला कमी**

लग्नाच्या रेशीमगाठी जुळल्यानंतर गावोगावी लग्नपत्रिका वाटप करताना आप्तेष्टांच्या दारात गेल्यावर मानपान, सन्मान मिळायचा. कोणाकोणाला निमंत्रण पत्रिका पोहोचली नाही, हे आठवावे लागायचे.

**निमंत्रणासाठी जुन्या परंपरांचाही वापर**

जमाना डिजिटल झाला असून, ऑनलाइन पत्रिका पाठविल्या जात आहेत, यात शंका नाही. मात्र, आजही काही ठिकाणी वयस्क मंडळींकडून जुन्या पद्धतीनेच निमंत्रण दिले जात आहे.

# अकोल्यात गॅस टँकर उलटला; सुदैवाने जयपूर अपघाताची पुनरावृत्ती टळली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अकोला**

जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर व्याळा गावाजवळ एक गॅस टँकर उलटल्याची दुर्घटना रविवारी दुपारी घडली. या अपघातात टँकर चालक गंभीर जखमी झाला आहे. गॅस टँकरचा अपघात झाल्यावर सुदैवाने त्यातून गॅस गळती झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला. अन्यथा जयपूर येथील गॅस टँकरच्या भीषण अपघात प्रकरणाची पुनरावृत्ती अकोला जिल्ह्यात घडण्याची शक्यता नाकारता आली नसती. अपघातामुळे वाहतुकीचा




खोळंबा झाला.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर अकोल्यावरून बाळापूरकडे इंडियन कंपनीचा गॅस टँकर (क्र. एमएच ०४ जेके १८७८) जात होता. दरम्यान, महामार्गावरील व्याळा गावाजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने टँकर रस्त्याच्या बाजूला उलटला. गॅस टँकरचा अपघात होताच परिसरात भीतीचे वातावरण पसरले. महामार्गावरून धावणाऱ्या इतर वाहन चालकांनी दूरच आपली वाहने रोखून धरली होती. त्यामुळे महामार्गावर दोन्ही बाजूला वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. या अपघाताची माहिती मिळताच पोलिसांसह संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळावर धाव घेतली. या अपघातात चालक आलोक विरेंद्र सिंह गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चालकाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. नशीब बलवत्तर म्हणून अपघातग्रस्त टँकरला आग लागली नाही. यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. या अपघातामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली होती.

# रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती रखडली? भाजपकडून तीन समित्यांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

भाजपचे प्रदेशाध्यक्षपद आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपर्यंत चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडेच राहावे, यादृष्टीने हालचाली सुरू झाल्या आहेत. माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती तूर्तास रखडल्याचे चित्र आहे.

बावनकुळे यांनी शनिवारी पक्षाच्या तीन समित्यांची घोषणा केली. प्रदेश संघटनपर्व समिती, प्रदेश शिस्तपालन समिती आणि प्रदेश सक्रिय सदस्यता अभियान समिती अशा या तीन समित्या आहेत.

प्रदेश संघटनपर्व समितीचे प्रदेश प्रभारी म्हणून रवींद्र चव्हाण यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. भाजपच्या संघटनात्मक बांधणीच्या नियोजनाची जबाबदारी चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. महाराष्ट्रात २१ डिसेंबरपासून संघटनपर्व सुरू करण्यात आले असून, या पर्वाची सुरुवात नागपूर येथून करण्यात आली. प्रदेश शिस्तपालन समितीच्या



अध्यक्षपदी नागपूरचे माजी आमदार प्रा. अनिल सोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, माजी आमदार अतुल शाह, योगेश गोगावले, किशोर शितोळे हे चार सदस्य या समितीमध्ये असतील. प्रदेश सक्रिय सदस्यता अभियानाच्या प्रमुखपदी प्रदेश सरचिटणीस प्रा. राजेश पांडे व प्रवीण घुगे यांची अभियान सहप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**प्रदेशाध्यक्ष बावनकुळे दिल्लीला रवाना**

चंद्रकांत पाटील हे २०२२ मध्ये मंत्री होण्यापूर्वी प्रदेशाध्यक्ष होते. ते मंत्री होताच दोनच दिवसात चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती.

मात्र, यावेळी बावनकुळे १५ डिसेंबरला मंत्री झाले तरीही नवीन अध्यक्षांची नियुक्ती पक्षाने केलेली नाही. बावनकुळे यांनाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपर्यंत अध्यक्ष ठेवावे, यासाठी काही नेते आग्रही असल्याचे म्हटले जाते.

मात्र, 'एक व्यक्ती, एक पद' या पक्षाच्या नियमानुसार बावनकुळे यांच्या जागी नवीन अध्यक्ष तातडीने नेमावेत, असा दबावही आहे. बावनकुळे हे रविवारी रात्री दिल्लीला रवाना झाले. नवीन प्रदेशाध्यक्ष पदाबाबत ते पक्षनेतृत्वाशी चर्चा करतील, अशी शक्यता आहे.

**प्रदेशाध्यक्ष निवड कधी?**

प्रदेशाध्यक्ष पदाच्या निवडणुकीची पूर्ण प्रक्रिया राबविणे किंवा पक्षनेतृत्वाने प्रदेशाध्यक्षांची नियुक्ती करणे, असे दोन पर्याय पक्षाकडे आहेत.

१२ जानेवारी रोजी शिर्डीत भाजपचे अधिवेशन होत असून, त्या आधी चव्हाण यांना प्रदेशाध्यक्षपदी नियुक्त करणार की चार महिन्यांनी त्यांना अध्यक्ष करणार, याबाबत उत्सुकता आहे.

# मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग लगत दत्तापुरसह १६ ठिकाणी होणार स्मार्ट सिटी तयार : आज मुंबईत उच्चस्तरीय बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०धामणगाव रेल्वे**

फेब्रुवारी २०२५ मध्ये या महामार्गाचा शेवटचा टप्पा म्हणजेच इगतपुरी ते आमने हा ७६ किलोमीटर लांबीचा टप्पा वाहतुकीसाठी दाखल होईल अशी माहिती राज्य रस्ते विकास महामंडळामध्ये कार्यरत असणार्या अधिकार्यांच्या माध्यमातून समोर आलेली आहे. दरम्यान याच समृद्धी महामार्ग लगत १६ ठिकाणी स्मार्ट सिटी तयार होणार आहे.

समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्रातील महत्त्वाकांक्षी महामार्ग प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे मुंबई ते नागपूर हा प्रवास वेगवान होणार आहे. या प्रकल्पांतर्गत मुंबई ते नागपूर दरम्यान ७०१ किलोमीटर लांबीचा महामार्ग तयार होत असून आत्तापर्यंत या प्रकल्पाचे निम्म्याहून अधिक काम पूर्ण झाले असून या महामार्गावरून वाहतूक देखील सुरू आहे.

समृद्धी महामार्गाचा नागपूर ते इगतपुरी हा ६२५ किलोमीटर लांबीचा टप्पा वाहतुकीसाठी सध्या सुरू आहे. सर्वप्रथम या




महामार्गाचा नागपूर ते शिर्डी हा ५२० किलोमीटर लांबीचा टप्पा वाहतुकीसाठी सुरू झाला. यानंतर शिर्डी ते भरवीर हा ८० किलोमीटर लांबीचा टप्पा वाहतुकीसाठी सुरू झाला. या वर्षाच्या सुरुवातीलाच भरवीर ते इगतपुरी हा २५ किलोमीटर लांबीचा टप्पा वाहतुकीसाठी सुरू झालाय. म्हणजेच आतापर्यंत समृद्धी महामार्गाचे तीन टप्पे वाहतुकीसाठी दाखल झाले असून लवकरच शेवटचा टप्पा देखील सर्वसामान्यांसाठी खुला होणार आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये या महामार्गाचा शेवटचा टप्पा म्हणजेच इगतपुरी ते आमने हा ७६ किलोमीटर लांबीचा टप्पा वाहतुकीसाठी दाखल होईल अशी माहिती राज्य रस्ते विकास महामंडळामध्ये कार्यरत असणार्या अधिकार्यांच्या माध्यमातून समोर आलेली आहे. जेव्हा हा संपूर्ण महामार्ग प्रकल्प वाहतुकीसाठी सुरू होईल तेव्हा मुंबई ते नागपूर दरम्यान चा प्रवास अवघ्या आठ तासात पूर्ण होणार असा दावा अधिकार्यांकडून केला जातोय. समृद्धी महामार्ग प्रकल्पामुळे मराठवाडा, विदर्भासहित पश्चिम - महाराष्ट्र आणि कोकणातील एकात्मिक विकासाला चालना मिळालेली आहे.समृद्धी महामार्गावर १६ ठिकाणी स्मार्ट सिटी प्रकल्प तयार करण्याच्या हालचालींना आता वेग आला असून येत्या ३० डिसेंबर रोजी स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या बाबतीत मुंबईत उच्चस्तरीय बैठक होणार आहे. यामध्ये महामार्गालगत विकसित केल्या जाणार्या स्मार्ट सिटी प्रकल्पासंदर्भात सविस्तर चर्चा होईल.

१- विरुल (चेनेज - ८०) वर्धा
२ दत्तापुर (चेनेज - १०५.७) अमरावती
३ शिवनी (चेनेज-१३७.५) अमरावती
४ शेह (चेनेज-१८२.५) कारंजा वाशिम
५ वानोज (चेनेज-२१०.५) वाशिम
६ रिधोरा (चेनेज-२३९.६) वाशिम
७ साब्रा (चेनेज-२८३.३) मेहकर बुलढाणा
८ माळ सावरगाव (चेनेज - ३४०) बुलढाणा
९ जामवाडी (चेनेज - ३६५) जालना
१० हडस पिपळगाव (चेनेज -४७०)
११ जांबरगाव (चेनेज -४८८.५) संभाजीनगर
१२ धोत्रा (चेनेज ५०५) कोपरगाव, नगर
१३ सावळा विहीर (चेनेज - ५२०) नगर
१४ फुगाले (चेनेज - ६३५) ठाणे
१५ सपगाव (चेनेज - ६७० ) ठाणे
१६- लेणाड (चेनेज - ६७३) ठाणे

# महापालिका निवडणुकीला मुहूर्त केव्हा? इच्छुकांना प्रश्न

## न्यायालयात निकाल लागला तरी तयारीला लागणार वेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचा टप्पा पार पडल्यानंतर आता महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर होतील, असे सांगितले जात होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकांवर २२ जानेवारी रोजी निर्णय होणार आहे. या दिवशी निकाल लागला तरी प्रभाग रचना, आरक्षण, सदस्य संख्या ठरविणे आदी प्रक्रिया पार पाडायला किमान तीन ते चार महिन्यांचा कालावधी लागू शकतो. त्यानंतर शाळांच्या परीक्षा, उन्हाळी सुट्या आणि पावसाळा, या गोष्टी लक्षात घेऊनच निवडणुकांची तारीख जाहीर होऊ शकते. त्यामुळे या निवडणुका लांबणीवर पडतील, असे सांगितले जात आहे. अमरावती महापालिकेत यापूर्वी भाजपची सत्ता होती.



महापालिकेची मुदत संपून दोन ते अडीच वर्षांचा कालावधी झाला. तेव्हापासून येथे प्रशासकराज आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित आरक्षण, संस्थांमधील सदस्य संख्या, प्रभाग रचना कशी असावी, प्रभाग रचना करण्याचे अधिकार सरकारचे की निवडणूक आयोगाचे, तसेच नगर परिषदांमधील ओबीसी आरक्षण याबाबत सर्वोच्च न्यायालयात तब्बल याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. यावर दि. २२ जानेवारी २०२५ रोजी सुनावणी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याचिकांवरील सुनावणीनंतर निकाल येईल. त्यानुसार राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाला पुढील प्रक्रिया पार पाडावी लागणार आहे. या सर्व प्रक्रियेत बराच वेळ जाण्याची शक्यता आहे. मात्र आता इच्छुकांना निवडणुकांचे वेध लागले आहे.

**या याचिका आहेत प्रलंबित**

मविआच्या सत्तेत महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमधील सदस्य संख्या वाढविण्यात आली होती. महायुती सरकारने ती पूर्वीप्रमाणे केली. याबाबत सुनावणी प्रलंबित आहे. न्यायालयाने वाढीव सदस्य संख्येला मान्यता दिली तर प्रभाग रचना, जिल्हा परिषदेतील गट रचना करण्यास वेळ लागेल.

प्रभाग रचना करण्याचा अधिकार यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाकडे होता. तो राज्य सरकारने कायद्यात बदल करून आपल्याकडे घेतला. तो अधिकार पुन्हा आयोगाला देण्याबाबत याचिका प्रलंबित आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाची तसेच ओबीसी आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर जाऊ नये, तसेच ओबीसी आरक्षणाची मर्यादा २७ टक्क्यांच्या वर जाऊ नये यासंदर्भातही याचिका दाखल आहे.

# योजनांच्या लाभासाठी 'आरसीएच' नोंद केली का?

## देशभरात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान; बालमृत्यू, माता मृत्यूंचे प्रमाण कमी करण्याचे उद्दिष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

देशात सर्वांगीण आरोग्य सेवांचा दर्जा हासंख्यात्मकच न राहता तो गुणात्मकरीत्या वाढविणे तसेच सेवा सहजसाध्य होऊन समाजातील सर्व घटकांना विशेषतः तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविणे, यासाठी संपूर्ण देशात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा पहिला टप्पा सन २००५ पासून कार्यान्वित करण्यात आला आहे. अर्भक मृत्यू व बालमृत्यूंचे प्रमाण कमी करणे, माता मृत्यूंचे प्रमाण कमी करणे आदी प्रमुख उद्दिष्टे साध्य केली जात आहेत. त्या अनुषंगाने महापालिका आरोग्य विभागाच्या माध्यमातून गरोदर मतांची नोंदणी,तपासणी, उपचारांसह लहान मुलांचे लसीकरण केले जाते. गर्भवतींनी शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी 'आरसीएच' नोंदणी करणे आवश्यक आहे.



**या योजनांचा मिळणार लाभ**

**१ प्रधानमंत्री मातृवंदना**

प्रधानमंत्री मातृवंदना योजना ही केंद्र सरकारची योजना आहे. जी महिला आणि बाल विकास मंत्रालय व समाजकल्याण विभागामार्फत राबविली जाते. महिलांना हप्त्यांमध्ये मदत दिली जाते. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलेला पाच हजार रुपये दिले जातात.

**२ जननी सुरक्षा योजना :**

जननी सुरक्षा योजना २००५-०६ या वर्षी सुरू केली आहे. या योजनेची नागरी भागात नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात अंमलबजावणीस मंजुरी दिली आहे. या योजनेत दारिद्र्यरेषेखालील मातांना लाभ देण्यात येतो.

**३ प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान :**

प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत महिन्याला गर्भवतींना खात्रीशीर, सर्वसमावेशक आणि दर्जेदार प्रसूतीपूर्व काळजी मोफत पुरवणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

**पालिकेच्या आरोग्य विभागात करा नोंद**

महापालिका आरोग्य विभागाच्या माध्यमातून आरसीएच पोर्टलवर महिलांची नोंदणी केली जाते.शहरातील सर्व विभागांतील गरोदर मतांची नोंदणी, तपासणी आणि उपचार व्हावेत तसेच लहान मुलांचे लसीकरण करण्यासाठी महापालिकेच्या नागरी आरोग्य केंद्राच्या माध्यमातून नोंदणी केली जाते.

**काय आहे आरसीएच नंबर नोंदणी**

आरसीएच म्हणजे प्रजनन आणि बाल आरोग्य. १५ ते ४९ वयोग- टातील सर्व विवाहित, गर्भवती महिलांना आरसीएच पोर्टलवर नोंदणी करावी लागते.

पोटर्लवर नोंदणी केलेल्या महिलांना एक युनिक आयडें- टिफिकेशन नंबर 'आरसीएच आयडी जारी करण्यात येत असतो.

# सगळेच सज्ज! थर्टी फर्स्टच्या सेलिब्रेशनचे ठरू लागले बेत : पोलिसांची राहणार करडी नजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

थर्टी फर्स्टरी सेलिब्रेशन अगदी एका दिवसावर येऊन ठेपले आहे. त्यादृष्टीने सर्वत्र तयारी सुरू झाली आहे. हॉटेल्स, ढाबे, रिसॉर्ट येथे त्यादृष्टीने लाइट्स, डीजे, साऊंड सिस्टीम, खाण्या-पिण्याचे नियोजन केले जात आहे. तर अनेक सोसायट्यांमध्येही छोटेखानी कार्यक्रम, पार्टीचे बेत आखले जात आहेत. काही घराचरांतही सेलिब्रेशनचा प्लॅन केला जात आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही चंद अमरावती मध्ये थर्टीफर्स्ट निमित छोट्या-मोठ्या पाठी रंगताना दिसणार आहेत.




मावळल्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी प्रत्येकाचे वेगवेगळे नियोजन असते. यात अनेकजण घरगुती छोटेखानी कार्यक्रम, तर कॉलन्यांमधील नागरिक एकत्रित येऊन सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ अशा प्रकारचे नियोजन करण्यात गुंतले आहेत.

जिल्ह्यातील चिखलदरा, मेळघाट परिसरात अनेक रिसॉर्ट तसेच फार्महाऊस गेल्या आठवड्यापासून बुक झाली आहेत. पर्यटकांसाठी विविध नियोजनही केले जात आहे

**हॉटेल, रिसॉर्ट मालकांची तयारी पूर्ण**

हॉटेल चालकांनीदेखील पूर्ण तयारी केली असून, त्यांनी पर्यटकांसाठी विविध सुविधा, पॅकेजेस, सूट जाहीर केली आहे. थर्टी फर्स्टसाठी चंद्रपूर शहरासह जिल्ह्यातील बहुतांश हॉटेल व रिसॉर्ट सज्ज झाले आहेत.

**मॉल्ससह टेरेसवर रंगणार कार्यक्रम**

शहरातील मोठमोठ्या अपार्टमेंटच्या टेरेसवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. टेरेसवरच रंगणाऱ्या पार्टीसाठीही प्रशासनाची परवानगी घेणे गरजेचे आहे.

# रविराज देशमुख मित्रपरिवाराच्या राष्ट्रीय शंकरपटात अमरावतीतील जिगरी ग्रुपच्या माऊली आणि महाराज बैलजोडीने पटकाविला प्रथम क्रमांक

## तिवसा येथे तीन दिवस दिमाखदार संपन्न झाला राष्ट्रीय जंगी भव्य किसान शंकरपट : शिरमाळचे देवा आणि बिट्टू ठरले क गटातील पहिल्या बक्षिसांचे मानकरी: विजयी शेतकऱ्यांचा एकच जल्लोष



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०तिवसा**

अमरावती मधील जिगरी ग्रुपच्या माऊली व महाराज ने ७ सेकंद २४ पॉईंट मध्ये बैलगाडा पहिल्या क्रमांकावर आणलाय, जोरदार टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. तिवसा येथील राष्ट्रीय भव्य जंगी शंकर पटामध्ये ऐकताच अमरावती च्या जिगरी ग्रुपने गुलाल उधळला. आणि अमरावती च्या शिरपेचात मानाचा तुरा रोवल्या गेला.

हिम्मत फाऊंडेशन व रविराज देशमुख मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित या जंगी शंकर पटामध्ये अ गटामध्ये तब्बल १५ बक्षिसे आणि क गटामध्ये तब्बल १४ बक्षिसे अशी लाखो रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली होती. ज्यामध्ये अ गटातील १ लाख रुपयांच्या प्रथम बक्षीसाचे मानकरी जिगरी ग्रुप अमरावती यांच्या माऊली व महाराज या बैलजोडीला प्राप्त झाले असून मान्यवरांच्या वतीने जिगरी ग्रुप चा सन्मानचिन्ह व शाल व पुष्पवृक्ष देऊन सन्मानित करण्यात आले. तर द्वितीय बक्षीस ५० हजार रुपयांचे बक्षीसांचे मानकरी संभाजीनगर येथील किशोर दिवटे यांच्या रुद्रा आणि चंद्रा बैलजोडीला, तर ६० हजार रुपयांच्या तृतीय बक्षिसांचे मानकरी वाशिम येथील अतिष वर्मा यांच्या भवऱ्या आणि मधूर या बैलजोडीला प्राप्त झाला असून त्यांना सुद्धा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पवृक्ष देऊन सन्मानित करण्यात आले.

त्याचबरोबर क गटातील २१ हजार रुपयांच्या पहिल्या बक्षिसांचे मानकरी शिरमाळ येथील सुरज अवधूत भुरे यांची देवा व बिट्टू ही बैलजोडी ठरली असून मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह व रोख रक्कम व पुष्पवृक्ष देऊन पुरस्कृत करण्यात आले. तसेच इतर बैलजोडीला मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह व रोख रक्कम व पुष्पवृक्ष देऊन पुरस्कृत करण्यात आले.

# मंत्री नितेश राणे यांच्या विघातक वक्तव्यांवर यशोमती ठाकूरांचा संताप

## मुख्यमंत्र्यांनी फालतू राजकारण करणाऱ्यांवर लगाम लावण्याची केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

केरळ राज्याबाबत मंत्री नितेश राणे यांनी केलेल्या समाजविघातक विधानावर माजी मंत्री ड. यशोमती ठाकूर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. राणे यांनी केरळ राज्याला मिनी पाकिस्तान संबोधून तेथील वायनाड मतदारसंघातून काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियांका गांधी निवडून येतात, असे वादग्रस्त विधान केले होते.



यशोमती ठाकूर यांनी ट्विटरच्या माध्यमातून आपली प्रतिक्रिया देताना भाजप नेत्यांवर जोरदार हल्ला चढवला. त्या म्हणाल्या, गांधी परिवाराने दहशतवादाचा सामना जवळून केला आहे. आपल्या परिवारातील दोन सदस्य गमावणाऱ्या या कुटुंबावर आरोप करताना भाजपच्या नेत्यांनी मर्यादा पाळली पाहिजे. आपल्या देशातील केरळ हे शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक प्रगतीत अग्रस्थानी असलेलं राज्य आहे. अशा राज्याला दहशतवादाशी जोडणं हा केरळच्या जनतेचा अपमान आहे.

यशोमती ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट इशारा देत म्हटलं की,कोंबडी चोर-मंगळसूत्र चोरांच्या जीवावर फालतू राजकारण करणाऱ्या नेत्यांना लगाम घाला. भाजपने आपल्या बोलघेवड्या नेत्यांना आवर घालण्याची गरज आहे.

तसेच, त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडेही सवाल उपस्थित करत विचारले की,आपल्याच देशातील एक राज्य जर दहशतवादी असेल, तर मग केंद्रीय गृहमंत्री अमित शहा काय करत आहेत?

केरळसारख्या प्रगत राज्याला अशा प्रकारे बदनाम करणाऱ्या वक्तव्यांवर नितेश राणे यांनी माफी मागावी, अशी मागणी यशोमती ठाकूर यांनी केली आहे.देशाच्या एकतेसाठी विघातक भूमिका घेणाऱ्या नेत्यांवर कठोर कारवाई होणं गरजेचं आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

# येत्या चार, पाच दिवसांत पारा ४ अंशांनी घसरण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

अमरावती जिल्ह्यात मागील आठ दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण आहे. दोन दिवसांपूर्वी शहरासह जिल्ह्यातील काही ठिकाणी हलक्या व मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली होती. मात्र सोमवारपासून (दि. ३०) वातावरण कोरडे राहणार असून, आकाश निरभ्र राहणार आहे. त्यामुळे थंडीत आता हळूहळू वाढ होणार असल्याचे हवामान अभ्यासकांनी सांगितले आहे.

वातावरण कोरडे होणार असल्यामुळे तापमानात घट येणार आहे. दरम्यान या आठवड्यात पारा किमान ४ ते ५ अंशांपर्यंत खाली येण्याची शक्यता आहे. त्यामुळे नव्या वर्षाच्या आगमनासोबतच पुन्हा एकदा थंडीचे आगमन होणार आहे. याच दरम्यान देशातील राजस्थान, दिल्ली, पंजाब आणि हरियाणामध्ये थंडीची लाट येण्याची शक्यता असल्याचे हवामान अभ्यासक प्रा. अनिल बंड यांनी सांगितले. दरम्यान शनिवारी शहरातील किमान तापमान १९.३ अंश तर कमाल तापमान २९.२ अंश नोंदवण्यात आले.

# नवीन वर्षात ३६५ दिवस सतत चालणार रक्तदानाचा महायज्ञ

## भाजपचे खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या पुढाकारातून आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती :**

रक्तदान हेच श्रेष्ठदान, रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा याला केंद्रबिंदू मानत रक्तदानाच्या माध्यमातून जीवनदान देण्याकरिता भारतीय जनता पक्षाचे खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी या नवीन वर्षामध्ये सतत ३६५ दिवस दररोज रक्तदान मोहीम राबवण्याचा संकल्प केलेला आहे. या माध्यमातून वर्षभर रोज किमान २५ बॉटल रक्तदान केल्या जाईल. सामान्य रुग्णालय येथील रक्तपेढीमध्ये हा रक्तसाठा जमा केल्या जाईल. या संकल्पामुळे वर्षभर रक्ताचा तुटवडा भासणार नाही. वर्षभर रक्त उपलब्ध होऊन सामान्य रुग्णालयामधल्या गोरगरीब रुग्णांचे जीव वाचवण्यासाठी मदत होणार असल्याची अपेक्षा देखील अनिल बोंडे यांनी केली आहे.

अमरावती जिल्ह्याला रक्तदानाचे खास वरदान लाभलेले आहे. सातत्याने रक्तदान चळवळीमध्ये सर्व नागरिक सहभागी होत असतात. परंतु तरीसुद्धा अनेक दिवशी विशेषता उन्हाळ्यामध्ये सणावाराच्या दिवशी रक्ताची गरज जास्त भासते. त्यावेळेला रक्ताचा मोठा तुटवडा निर्माण होतो. विविध आजारामध्ये ज्याप्रमाणे डेंग्यू, मलेरियामध्ये प्लेटलेट कमी झाल्या तर रक्ताची गरज भासते. वाढते अपघात, शस्त्रक्रिया



त्याचप्रमाणे प्रसूतीच्या दरम्यान महिलांना लागणारे रक्त या सगळ्या गोष्टीची पूर्तता करताना सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथील रक्तपेढीला प्रयत्नाची पराकाष्टा करावी लागते. अमरावती जिल्ह्यामध्ये रक्तदान मोठ्या प्रमाणात होते. परंतु रोज रक्तदान होत नसल्यामुळे रोजची गरज किमान ४० ते ४५ पिशव्यांची आहे. त्यामुळे अतिशय वेळाने रक्त रुग्णालयाला प्राप्त होते. या सगळ्या गोष्टीची पूर्तता करण्याकरता रोज रक्तदानाच्या माध्यमातून २५ ते ३० पिशव्या जर रक्तदान झालं तर रक्त देण्याचे नियोजन या रुग्णालयामध्ये उत्कृष्टरित्या करता येणार आहे. ही बाब लक्षात घेता भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष व राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी संपूर्ण वर्षभर कार्यकर्ते तसेच जनतेच्या माध्यमातून रोज ३६५ दिवस रक्तदान शिबिर आयोजित करण्याचे ठरविले. त्यासाठी ज्यांचा वाढदिवस येतो त्यांच्याकडे रक्तदान शिबिर आयोजित केल्या जाईल. त्यासोबतच रक्तदान शिबिर आयोजित करणारे आणि रक्तदात्यांचा सत्कार डॉ.अनिल बोंडे आणि त्यांचे सहकारी रोज करणार आहेत. ३६५ दिवस सतत रक्तदान महायज्ञाची सुरुवात १ जानेवारीपासून डॉ.अनिल बोंडे यांची कन्या मनाली बोंडे यांच्या वाढदिवसा पासून करण्यात येत आहे. बोंडे हॉस्पिटलच्या जवळ असलेल्या जागेवर हे रक्तदान आयोजित करण्यात आलेले आहे. या दिवसापासून या मोहिमेची सुरुवात करून शहरांमध्ये व जिल्ह्यात रक्तदान शिबिर आयोजित करण्यासाठी नागरिकांनी समोर यावे असे आवाहन देखील डॉ.अनिल बोंडे यांनी केले आहे.